|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १४ अंक : ६ सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ ते रविवार दि. १ मार्च २०२६ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

## कारल्याच्या भाजीने नाती कडवट झाली मुलानेच जन्मदात्या आईची हत्या केली

चंद्रपूर : क्राईम रिपोर्टर

कारल्याची भाजीसुद्धा नात्यात किती कडवटपणा आणू शकते याचा प्रत्यय चंद्रपूरच्या डोंगरगावात बघायला मिळाला. आईने ताटात कारल्याची भाजी वाढल्यामुळे एक दारुडा मुलगा इतका चिडला कि त्याने आईशी कडाक्याचे भांडण केले हे भांडण इतके विकोपाला गेले कि चिडलेल्या मुलाने आईवर प्राणघातक हल्ला करून आईची हत्या केली. या प्रकरणी आरोपी मुलाला पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास सुरु आहे. ....पान २ वर

# मुलीचा मृतदेह पुरण्यासाठी गादीत गुंडाळून नेला सतर्क रिक्षाचालकामुळेच हत्येचा उलगडा झाला





छत्रपती संभाजीनगर : क्राईम रिपोर्टर

आईसाठी मुलगा आणि मुलगी दोघेही सारखेच असतात कारण तिनेच दोघांना जन्माला घातलेले असल्याने दोन्ही मुलांवर तिची सारखीच माया असते. पण मुलीवर तिचा अधिक जीव असतो. याचे कारण दोघीही स्त्रिया असल्याने एकमेकींचे प्रश्न एकमेकींच्या अडचणी त्यांच्या गरजा आणि स्त्रीसुलभ भावना जवळपास सारख्याच असतात. त्यामुळे कधी कधी मुलगी चुकली तरी आई तिला पाठीशी घालून सांभाळून घेते. काही उच्च शिक्षित कुटुंबांमध्ये तर आई आणि मुलीमध्ये मैत्रिचे नाते असते. त्यामुळे प्रत्येक गोष्ट त्या एकमेकींशी शेअर करीत असतात. मुलीला जितकी आई सांभाळून घेते इतका बाप किंवा भावू सांभाळून घेवू शकत नाही. कारण ते पुरुष असतात. त्यामुळे त्यांचे मन त्यांच्या भावना या त्यांच्या कुटुंबाच्या प्रती असलेल्या जबाबदारीला बांधील असतात. त्यामुळे कुठलाही पिता आपल्या मुलीच्या चुकांवर पांघरून घालू शकत नाही किंवा भावू आपल्या बहिणीने केलेली चूक माफ करू शकत नाही, पण आई मात्र मुलीच्या सर्व चुका मुलीवरील मायेपोटी माफ करते पण संभाजीनगरमध्ये उलट घडले. पतीपासून विभक्त राहत असलेल्या मुलीचे दुसऱ्या एका तरुणावर प्रेम जडले आणि तिला त्या तरुणाशी लग्न करायचे होते, पण आई आणि सावत्र बापाचा विरोध होता. यावरून झालेल्या भांडणात मुलगी आईला म्हणाली तू दुसरा नवरा केलास मग मी प्रेम केले तर काय हरकत आहे. मुलीचा हा उलट प्रश्न तिच्या आईच्या इतका जिव्हारी लागला कि तिने मुलीचा गळा आवळून तिची हत्या केली आणि घर बदलण्याच्या बहाण्याने मृतदेहाची गुपचूप विल्हेवाट लावण्यासाठी तो गादीत गुंडाळून घरातील इतर सामना सोबत नेत असताना रिक्षावाल्याला संशय आला, त्याने पोलिसांना कळवले. त्यामुळे पोलिसांनी येऊन गादीत गुंडाळलेला मृतदेह ताब्यात घेतला आणि त्या दुर्दैवी मुलीच्या खुनी आई-वडिलांना अटक केली.

आपल्या पोटच्या मुलीचा गळा आवळून खून केल्यानंतर तिचा मृतदेह एखाद्या सामानासारखा गादीत गुंडाळून त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या निर्दयी आईला वाळूज पोलिसांनी अटक केली आहे. नंदिनी राजू धिवरे (२०) असे मृत तरुणीचे नाव असून, या प्रकरणात आई भारती साबळे, सावत्र वडील आणि मामा यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. नंदिनी गेल्या तीन वर्षापासून पतीपासून विभक्त होऊन आई भारतीकडे राहत होती. या काळात तिचे कन्नड येथील एका तरुणावर प्रेम जडले. तिला त्याच्याशी लग्न करायचे होते, पण आईचा याला तीव्र विरोध होता. १९ फेब्रुवारी रोजी दुपारी पुन्हा याच कारणावरून वाद झाला. यावेळी नंदिनीने विचारले, तू दुसरा नवरा केलास, मग मी प्रेम केलं तर दुसरं लग्न करायला काय हरकत आहे? मुलीचा हा प्रश्न आईच्या मनाला लागला आणि तिने रागाच्या भरात नंदिनीचा रबरी पाईपने गळा आवळून खून केला. हत्या केल्यानंतर भारतीने तिचा पती उमेश साबळे आणि भाऊ अमोल गायकवाड यांच्या मदतीने मृतदेह कन्नड येथील शेतात नेऊन पुरण्याची योजना आखली. कोणाला संशय ....पान २ वर

# लग्नानंतर आटले प्रियकराचे प्रेम ब्लॅकमेलर प्रेयसीचाच केला गेम

गडहिंग्लज (कोल्हापूर) : क्राईम रिपोर्टर



माणूस जेंव्हा अविवाहित असतो तेंव्हा शरीरसुखासाठी आसुसलेला असतो. अशावेळी एखादी विवाहित महिला त्याच्या जीवनात आली कि तिच्यासाठी तो काहीही करायला तयार असतो. कारण त्याला ते सुख हवे असते. पण जेंव्हा त्याचे लग्न होते आणि शरीर सुखासाठी घरात हक्काची बायको मिळते. त्यानंतर त्याला प्रेयसीची गरज नसते, पण प्रेयसी मात्र त्याला सोडायला तयार नसते. अशावेळी तिचा पिच्छा सोडवण्यासाठी तिला मार्गातून दूर करणे हाच एक पर्याय असतो. कोल्हापूर जिल्ह्याच्या भडगावमध्ये राहणाऱ्या प्रविण चंद्रकांत चिंचेवाडी याने तेच केले. त्याच्या लग्नानंतर त्याला प्रेयसीने त्रास द्यायला सुरुवात करताच त्याने तिची गळा आवळून हत्या केली. या प्रकरणी आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.



गडहिंग्लज तालुक्यातील भडगाव येथे संजय केसरकर हे आपली पत्नी सुनिता आणि दोन मुलासह राहयला आहेत. संजय केसरकर हे ऊस तोडणी मजुरीचे काम करायचे तर सुनिता या बांधकाम मजुरीचे काम करीत होत्या. त्याच्या लग्नाला वीस वर्ष होत आली होती. सुनिता केसरकर आणि संजय केसरकर हे भडगाव येथे सासु सासरे आणि दोन मुलासह राहयला आहेत. घरच्या गरिबीच्या परिस्थीतीमुळे संजय केसरकर हे मजुरीसोबत ऊस तोडणीचे ही काम करीत होते तर सुनिता या बांधकाम कामगार म्हणून गंवडयाच्या हाताखाली मजुरीला जात होती. वयाच्या ४०शीतील सुनिता ही देखणी सुंदर होती. मुले मोठी झाली असल्याने तिला आपल्या नवऱ्यात इंटरेस्ट राहिला नव्हता. तसा तो ही रात्रीच्या खेळात कमी पडत असल्याने ती आपले मन दुसरीकडे रमविण्याचा प्रयत्न करीत होती. अशातच तिची नजर सावध शोधत असताना तिची ओळख आणि नजरा नजर ही



गावातील प्रविण चंद्रकांत चिंचेवाडी याच्याशी झाली. त्याने ही तिच्या नजरेतील ओळखल्याने तो ही तिच्याशी लगट करीत बोलत होता. लवकरच त्याच्यात नको ते संबंध निर्माण झाले. प्रविण हा तिला काय पाहिजे काय नको ते पाहत होता. जवानीने रसलेली सुनिताला नवऱ्याला पाहिजे ते मिळत नाही हे प्रविणने ओळखले. ....पान २ वर

## फेटेवाल्याचा अनैतिक सहवास वाढला प्रेयसीसाठी त्याने पत्नीचा काटा काढला



कोल्हापुर : क्राईम रिपोर्टर

आजकाल व्यभिचार इतका बोकाळला आहे कि समाजातील स्त्री पुरुष शरीरसुखासाठी सुखी संसाराकडे पाठ फिरवून अनैतिक संबंधाच्या चक्रव्युहात अडकत आहेत. मात्र अशा संबंधाचा शेवट खूप वाईट असतो हे अनेक वेळा बघायला मिळाले आहे. कोल्हापुरी फेट्यासाठी प्रसिद्ध असलेले गणेश हुबले यांचेही असेच झाले. कोल्हापुरात त्यांचे कोल्हापुरी फेटे बांधण्याचे दुकान आहे. मात्र दुकानात सेल्सगर्ल ठेवल्यापासून त्यांच्या संसाराची गाडी रुळावरून घसरली. दुकानातील सेल्सगर्ल बरोबर अनैतिक संबंध सुरु होताच पती पत्नीमध्ये वाद सुरु झाले. भांडणे होऊ लागली व एकेदिवशी अशाच भांडणात गणेशने पत्नीचा गळा आवळून खून केला.

जगात भारी कोल्हापुरी फेटा भारी असे म्हटले जाते कोल्हापुरी फेटयाची रंगत आणि नजागत लयच भारी म्हणून ....पान २ वर

# वडिलांना शिवीगाळ केल्याने आसिफ चिडला दारूच्या पार्टीतच शाबाजचा मुडदा पाडला

इचलकरंजी : क्राईम रिपोर्टर



प्रत्येक माणसाला त्याच्या आईवडिलांविषयी आदर असतो. त्यामुळे त्यांना कुणी काही वाईट बोलले किंवा शिवीगाळ केलेली मुलाला आवडत नाही. शाबाज आणि आसिफ हे मित्र होते. पण त्यांच्यात काही कारणावरून वाद झाला. हा वाद आसिफच्या वडिलांनी मिटवण्याचा प्रयत्न केला, पण शाबाजने आसिफच्या वडिलांनाच शिवीगाळ केली. याचा आसिफला इतका राग आला कि त्याने आपल्या इतर मित्रांच्या मदतीने शाबाजचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.



इचलकरंजी शहराची ओळख ही तशी वस्त्रउदयोग नगरी म्हणून आहे. गेल्या अनेक वर्षापासून शहापूर मधील कॉ.मलाबादे नगर येथे शब्बीर शेख हे पत्नी मुला, मुलगी सह राहयला आहेत. शब्बीर शेख हे सुरवातीपासून यंत्रमाग कामगार म्हणून काम करीत होते. त्याचा मुलगा शबाज हा कोणताही काम धंदा करीत नव्हता. तो आपल्या जवळच्या



मित्राबरोबर दारू पिऊन घरातील लोकांना त्रास देवू लागल्याने त्याच्या वडिलांनी त्याला सांगली येथील मामाकडे काही दिवस राहयला पाठविले. त्यावेळे पासून ....पान २ वर

## काकाला देत नव्हता जराही भाव पुतण्यावर घातले कुऱ्हाडीचे घाव

बुलढाणा : क्राईम रिपोर्टर



आरोपी विनोद

प्रत्येक माणसाला एक 'इगो' असतो आणि याच 'इगो'मुळे त्याला कुणी बोललेले सहन होत नाही. हातणी गावात राहणारा विनोद जाधव हा दारुडा असला तरी त्यालाही 'इगो' होता. एके दिवशी विनोद याचे बापाबरोबर भांडण झाले, या भांडणात त्याचा पुतण्या गोपाल मधे पाडला आणि त्याने चुलत्याला सर्वांच्या समोर चार गोष्टी सुनावल्या. त्याचा विनोदला भयंकर राग आला, आपल्यापेक्षा नात्याने आणि वयाने लहान असलेल्या पुतण्याने आपल्याला चार गोष्टी सुनवाव्यात हे विनोदला आवडले नाही. त्यामुळे विनोदचा 'इगो' दुखावला व रागाच्या भरात रात्री विनोदने झोपलेल्या गोपालच्या डोक्यात कुऱ्हाडीचे घाव घालून त्याची हत्या केली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

चिखली तालुक्यातील हातणी गावात रामचंद्र मारूती जाधव हे आपल्या कुटुंबासह रहातांत, त्यांना अजबराव आणि विनोद अशी दोन मुले आहेत. दोघेही विवाहित आहेत. या दोन मुलांपैकी अजबराव यांचे काही वर्षापूर्वी निधन झाले, तसेच त्यांच्या पत्नीचेही निधन झाले असल्यामुळे त्यांचा मुलगा गोपाल आणि एक ....पान ६ वर

# कबुदरावरून मैत्रीचा धागा तुटला मित्रच मित्राच्या जीवावर उठला




धुळे : ललित खरे

कबुतर पाळणे मनुष्याच्या आरोग्याला हानिकारक असते हे खुद्द वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांनी सांगितलेले असताना काही लोक कबुतरे पाळतात. धुळे जिल्ह्याच्या सक्री शहरात नूर आणि शोएब या दोन मित्रांना कबुतरे पाळण्याचा छंद होता. मात्र याच काबुदारांवरून दोघांमध्ये वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला कि नुर याने शोएब याला गोड बोलून घरी बोलावले आणि त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

कबुतर पाळणं हा सध्या चर्चेचा विषय बनला आहे, कारण कबुतराची विष्ठा कुठल्याही प्राण्याचा घात करते. त्याला मनुष्य प्राणीही अपवाद नाही, म्हणूनच मुंबईतील कबुतरखाना बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. त्याला काही घटकांकडून विरोधही झाला, पण कबुतरांवरून झालेल्या वादात धुळे जिल्ह्यातील ....पान ६ वर

## दागिन्यांसाठी रक्ताचे नाते कुचकामी ठरले नातवाने आजीला चहात विष देऊन मारले

कोल्हापूर : क्राईम रिपोर्टर



आजकाल पैशांसाठी माणूस कुठल्या थराला जाईल याचा नेम नाही. पैसे दागिने आणि जमिनीसाठी माणूस रक्ताच्या नात्यांची सडा पाडतो. कोल्हापुरात अशाच एका घटनेत दागिन्यांसाठी एका नराधम नातवाने आजीला चहात विष घालून मारले आणि तिचे दागिने घेऊन पळाला. मात्र पोलिसांनी या नातवाच्या कोंकणातून मुसक्या आवळल्या आहेत.

गंगावेश परिसरातील ऋणमुक्तेश्वर मंदिराजवळील शुक्रतारा अपार्टमेंटमध्ये उषा मारुती भिऊंगडे (वय ७२) यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (१६ फेब्रुवारी) घडली होती. त्यावेळी पोलिसांना नैसर्गिक मृत्यू न वाटता यामागे घातपात असल्याचा संशय होता. या प्रकरणाचा सखोल तपास केल्यानंतर आता आजीच्या नातवाने तिचा खून केला असल्याचं उघड झालं आहे. उषा यांचा चुलत नातू प्रेम परशुराम भिऊंगडे (वय २०) याने चैनीसाठी सोन्याचे दागिने लुटण्याच्या हेतूने विषारी पावडर टाकलेला चहा पाजून खून केल्याचा धक्कादायक प्रकार स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणला. प्रेमला अटक करून दहा तोळे सोन्याचे दागिने जप्त ....पान ६ वर

# मांडवलीसाठी जमले पण राडा झाला चाकूच्या हल्ल्यात एकाचा जीव गेला

लातूर : शंकर सोनवणे



आजकाल लोकांमध्ये शुल्लक गोष्टीवरून वाद होतात आणि हे वाद इतके विकोपाला जातात की अशा वादातून एखाद्याला आपला जीवही गमवावा लागतो. लातूरमध्ये असेच घडले. लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन येथे डिप्लोमा करण्यासाठी आलेल्या केदार महादेव क्षिरसागर याचे दुचाकीचे ज्युपिटर मीटर फोडल्याच्या कारणावरून तिथल्याच विद्यार्थ्यांशी वाद झाला होता. हा वाद मिटवण्यासाठी केदार याने आपला मित्र श्रीधर जाधव याला बोलावले होते. श्रीधर जाधव हा नुकताच जेलमधून सुटून आला होता. दरम्यान ज्यांच्याशी वाद होता तेही तयारीत होते. त्यामुळे दोन्ही गटात राडा झाला आणि केदारच्या मित्राने प्रतिस्पर्ध्यावर चाकूने हल्ला केला यात एकाचा मृत्यू झाला तर एक जखमी झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नंदि स्टॉप हा भाग नेहमीच वरदळीचा आणी गजबजलेला असतो. कारण याच रोडलगत जिल्हा क्रीडा संकुलन, आयटीआय, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, मुलांचे आणि मुलींचे वस्तीग्रह, ट्युशन एरिया तसेच औसा शहराकडे जाणारा बस स्टॉप याच ठिकाणी असल्यामुळे येथे नेहमी लोकांची वर्दळ असते. या वरदळीचा ....पान ६ वर

पान १ वरून...

## कारल्याच्या भाजीने नाती कडवट ....

दारु पिल्यानंतर उद्धवलेल्या रागामध्ये जन्म दिलेल्या आईचा जीव घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेने सध्या सर्वत्र खळबळ उडाली आहे. ही संतापजनक घटना चंद्रपूरमधील डोंगरगावात घडली आहे. यावेळी आई आणि मुलामध्ये अत्यंत साधारण कारणावरुन भांडण झाले आणि या भांडणाचे रुपांतर भयावह शेवटात झाले आहे. त्यामुळे दारुचे व्यसन हा किती नुकसानकारक प्रकार ठरु शकतो हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. याप्रकरणामध्ये घडलेला प्रकार पोलिसांनी सांगितला आहे. त्यानुसार आरोपीचे नाव हे जगदीश पेटकुले आहे. तो ३६ वर्षाचा आहे. त्याची आई मृत सुमित्राबाई पेटकुले यांचा त्याने खून केला आहे. त्या ६५ वर्षाच्या होत्या. स्वतः च्या आईला ज्या कारणाने जगदीशने संपवले ते ऐकून तुमच्या पायाखालची जमीन सरकेल. फक्त कारल्याची भाजी बनवली या गोष्टीवरुन हा वाद झाला. हाच वाद पुढे अत्यंत विकोपाला गेला आणि त्यातच जगदीशच्या हातून अनर्थ घडला. पोलिसांनी दिलेल्या अधिकच्या माहितीनुसार आरोपी जगदीश याची पत्नी गेले दोन महिने ही त्याच्यापासून दूर राहत होती. त्याच्या दारूच्या व्यसनाला तिही कंटाळली होती. जगदीशला दोन मुलंही आहेत. मात्र पत्नी घरी नसताना आईसोबत राहणाऱ्या आरोपी जगदीशमने आईसोबत स्वयंपाकावरुन झालेल्या वादानंतर तिचा जीवच घेण्याच पाप केलं आहे. काल रात्री त्याच्या आईने स्वंयपाक केला होता. मात्र ताटात कारल्याची भाजी पाहून जगदीशच्या डोक्यात प्रचंड राग भरला आणि त्यातून दोघांमध्ये वाद सुरु झाला. हा वाद पुढे भीषण घटनेत संपला. जगदीशला यावेळी राग एवढा अनावर झाला की त्याने स्वतःच्या जन्मदात्या आईला अमानुष अशा प्रकारची मारहाण केली. तिला डोक्याला आणि छाती व शरिराच्या इतर भागांनाही गंभीर दुखापत झाली त्यानंतर आईचा जागीच जीव गेला. यावेळी घराजवळील शेजाऱ्यांनी आरडाओरड केली मात्र काही उपयोग झाला नाही, तोपर्यंत सुमित्राबाई या रक्ताच्या थारोळ्यात पडल्या होत्या. संबंधित प्रकाराची माहिती पोलिसांना समजताच घटनास्थळावर जाऊन त्यांनी पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आणि आरोपी जगदीश पेटकुले याला ताब्यात घेतलं. त्याच्यावर हत्येच्या गुन्हा नोंदवला आहे. प्राथमिक तपासाअंती आरोपी हा दारुच्या नशेत असल्याचे स्पष्ट झाले आहे. दारुच्या व्यसनामुळेच जगदीशने हे कृत्य केले असल्याचे नागरिकांनाही यावेळी सांगितले आहे.

## मुलीचा मृतदेह पुरण्यासाठी गादीत...

येऊ नये म्हणून त्यांनी 'आम्ही घर बदलत आहोत' असा बनाव केला. त्यांनी नंदिनीचा मृतदेह घरातील गादीत गुंडाळला आणि इतर घरगुती सामानासह एका रिक्षामध्ये भरला. रात्रीच्या वेळी तिसगाव चौफुली परिसरातून रिक्षा जात असताना, त्यातील संशयास्पद हालचाली आणि वागण्यामुळे रिक्षाचालकाला संशय आला. त्याने तात्काळ पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी रिक्षा थांबवून तपासणी केली असता सामानामध्ये लपवलेल्या गादीत नंदिनीचा मृतदेह आढळला. सुरुवातीला आईने मुलीने आत्महत्या केल्याचा दावा केला, पण पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये गळा आवळल्याचे सिद्ध झाल्याने आईने गुन्हा कबूल केला.

## लग्नानंतर आटले प्रियकराचे ...

तिला आपल्या अंगाखाली घेऊन तिची जवानी लुटण्यासाठी तो संधी शोधु लागला. ती कामावर जात असताना त्याने तिला दोन तीन वेळा एकटीला गाठले. गोड बोलून तिच्याशी सलगी वाढवली. आता तो तिला बाहेर नेऊ लागला. गेल्या पाच सात वर्षापासून त्याच्यात शरीरसंबंध चालू राहिले पण याची कानोकान खबर मात्र सुनिता हिचा पती संजय केसरकर याला लागू दिली नाही. ती कामाला जातो तर कधी बाजारला जातो म्हणून प्रविण याला बाहेर भेटायला जात होती. तो ही तिच्यासाठी काय वाटेल ते करायला तयार होता. तिची जवानी उपभोगून तो तिची प्रत्येक गरज पुर्ण करीत होता. त्यामुळे ती ही तिच्यावर चांगलीच फिदा झाली होती. पण अशातच प्रविणचे लग्न झाले. तो आता आपल्या बायको मुलात रमू लागला. तो सुनिताकडे जास्त लक्ष देत नव्हता.त्याचा तिच्यातील इंटरेस्ट कमी होत चालला होता, परंतु इकडे मात्र सुनिता त्याच्यासाठी तळमळत होती. ती त्याला त्या कामासाठी बाहेर बोलावित होती. तो मात्र तिला टाळत होता तिचा मोबाईल ही तो घेत नव्हता. त्यामुळे ती त्याच्यावर चिडत होती. त्याने तिच्याशी हल्ली संपर्क कमी केल्याचे तिच्या लक्षात आले होते. त्यामुळे ती त्याला सारखे फोन करून त्याला धमकावत मला जर तु भेटला नाहीस तर मी तुझ्या विरोधात पोलीसात तक्रार करेन अशी धमकी देवू लागली होती. ती त्याला मला तु हल्ली पैसे देत नाहीस, मला तु शरीर सुख ही देत नाहीस बायको आल्यावर मला विसरला परंतु मी तुला तशी सोडणार नाही, तुझा संसार मी मोडून टाकेन अशी धमकी देवून ती त्याला ब्लॅकमेल करू लागली. तो तिला वारंवार सांगत होता की, माझे आता लग्न झाले आहे. मला बायको मुले आहेत. लग्नाच्या अगोदर सगळे काही ठिक होते परंतु माझ्या लग्नानंतर मी तुझ्याशी संबंध ठेवू शकणार नाही त्याने तिला सरळ सरळ असे सांगित्यावर ती त्याच्याशी भांडण करून तुला बघून घेते तुझा संसार रस्त्यावर आणते असे म्हणत होती. तिच्या या धमकीला आणि त्रासाला प्रविण हा कंटाळलेला होता. हिच्या पिच्छा आपल्या मागून सोडवायचा तर काय करायला पाहिजे याचा तो विचार करीत होता. ती सांगून ही ऐकत नव्हती. ती त्याला सारखे भेटण्याचा तगादा लावत आणि पैसे मागत होती तो आता कंटाळलेला होता. ही बया काही केल्या ऐकणार नाही म्हणून त्याने आता वेगळाचा विचार केला. तुला भेटतो म्हणून त्याने तिला दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी तिच्या मोबाईलवर फोन केला. त्याचा फोन आल्यावर सुनिताने आपण आज रविवार असल्याने आठवडा बाजाराला जातो असे सांगून घरातून बाहेर पडली. गावातून बाहेर ती गेली. गावाच्या बाहेर गेल्यावर प्रविणने तिला आपल्या दुचाकी गाडीवर बसविले. ते दोघे ही संध्याकाळच्या सुमारास महागावच्या जंगल परिसरात गेले. तेथे निर्जन स्थळी तिने त्याला आपल्या अंगावर ओढून घेत मस्तपैकी शरीरसुख घेतले. त्यानंतर त्या दोघात वादावादी सुरू झाली. तिने त्याच्याकडे खर्चासाठी पैसे मागितले. त्यावेळी त्याने तिला थोडे फार पैसे दिले.परंतु ती तेवढयावर समाधानी नव्हती. ती त्याच्याशी वाद घालत मी काही तुझी बायको नाही, तुझ्याबरोबरर फुकट झोपायला. तु माझ्याबरोबर कायम राहिला नाहीस तर तुझा संसार बघ मी कशी विस्कटते अशी तंबी दिली. त्या दोघात वाद सुरू झाला. दोघात जोरात वाद सुरू असताना त्याने तिचा गळा जोरात आवळून धरला. ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा जीवाच्या आकांताने प्रयत्न करू लागली. परंतु त्याने जोरात गळा आवळ्याने तिला काहीच हालचाल करता आली नाही. काही क्षणातच तिची हालचाल मंदावली. तिचा जागीच मृत्यु झाला. आता हिच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची याचा तो विचार करू लागला. त्या आधी त्याने तिचा मोबाईल घेऊन स्विच ऑफ केला. त्यानंतर तिच्या गळ्यातील सोन्याचे दागिने काढून घेतले.रात्रीच्या अंधारात तिचा मृतदेह आपल्या गाडीवर कसा तरी ठेवला. तो मृतदेह त्याने महागाव-मासेवाडी रस्यावरील जंगलातील हिरण्यकेशी नदी कडे जाणाऱ्या एका ओढयाच्या पात्रात टाकला.तो भाग संपुर्णपणे जंगलमय असल्याने सहसा तिकडे कुणी जात येत नव्हते. इकडे सुनिता केसरकर या बेपत्ता होऊन वीस दिवस होऊन गेले होते. तिचा मोबाईल ही स्विच ऑफ लागत होता. गडहिंग्लज पोलीस तिचा शोध घेत असताना दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी महागाव मासेवाडी येथील ओढयाच्या पात्रात एका महिलेचा शीर नसलेला मृतदेह पडला असल्याचे माहिती पोलीस पाटील प्रदिप कांबळे यांना मिळाली.त्यांनी घटनास्थळी जावून पाहणी केली असता मयत महिलेच्या अंगावर साडी होती, तसेच तिचे शीर ही नव्हते. फक्त धड वाहत्या पाण्यातून दिसत होते. मयत महिलेचा उजवा हात ही वन्य प्राण्यांनी खाल्लेला होता. प्रदिप कांबळे यांनी या घटनेची माहिती गडहिंग्लज पोलीसांना दिली. गडहिंग्लज पोलीस स्टेशनचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. स.पो.नी सागर पाटील उप.निरी हणमंत नाईक याचेसह आदीनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची पाहणी करून वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांना या घटनेची माहिती देण्यात आली. घटनास्थळी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.उपनिरी.संतोष गळवे हे ही दाखल झाले.फॉरेनिक्स लॅबची टीम ही घटनास्थळी पोहचली. उप विभागीय पोलीस अधिकारी रामदास इंगवले जिल्हा पोलीस प्रमुख योगेश कुमार यांनी घटनास्थळी भेट देवून घटनेची पाहणी करून पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. घटनास्थळी गडहिंग्लज पोलीसांनी आसपासच्या परिसरातून बेपत्ता झालेल्या महिलेच्या नातेवाईकांना ही बोलावून घेतले. त्यावेळी घटनास्थळी संजय केसरकर आणि त्याचे नातेवाईक ही उपस्थित होते. त्यांनी मयत महिलेच्या चप्पलावरून आणि तिच्या अंगावरील साडीवरून ती मयत महिला सुनिता संजय केसरकर ही असल्याचे पोलीसांना सांगितले. मयत महिलेची ओळख पटल्यानंतर पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी गडहिंग्लज येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला.पोलीस या घटनेचा तपास करीत असता सुनिता केसरकर या जंगल परिसरात एकटया कशा काय आल्या, शिवाय तिचा मोबाईल फोन आणि दागिने ही लंपस झालेले होते. यावरून पोलीस तपास करीत होते. परंतु पोलीसांना अनेक प्रश्न निरूउत्तर करीत होते. कारण त्याचा मृतदेहाचे काही अवषेश हे जंगली प्राण्यांनी खाल्ले असले तरी तिच्या गळ्यातील सोन्याचे दागिने आणि मोबाईल कुणी नेला असा प्रश्न पोलीसांना पडला होता. स्थानिक गुन्हे अन्वेषचे पोलीस या घटनेचा तपास करीत असताना ती ज्यावेळी बेपत्ता झाली त्यावेळी तिच्या मोबाईलचा सीडीआर काढला त्यावेळी पोलीसांच्या लक्षात आले की. दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी ती ज्यावेळी बाजाराला जातो असे सांगून घरातून निघून गेली त्यावेळी तिने प्रविण चंद्रकांत चिंचेवाडी या तरूणाशी बऱ्याच वेळेला संपर्क केला होता. तसेच २१ दिवसांनी ज्यावेळी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्यावेळी तिचा मृतदेह ओढयाच्या पाण्यात सापडला त्यावेळेपासून प्रविण चिचेंवाडी याचा मोबाईल देखील बंद लागत होता. यावरून पोलीसांचा त्याचेवरील संशय बळावला. स्थानिग गुन्हे शाखेचे पोलीस त्याचा शोध घेत असताना दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी तो पोलीसांच्या जाळ्यात अडकला. त्याला गडहिंग्लज पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलीसांनी त्याच्याकडे या गुन्हयाची चौकशी केली त्यावेळी त्याने आपला गुन्हा कबुल करून मयत सुनिता केसरकर हिच्याबरोबर आपले विवाहबाहय संबंध असल्याचे मान्य केले. ती ते संबंध पुढे चालू ठेवण्यासाठी माझ्यावर दबाव टाकत मला ब्लॅकमेल करून खर्चाला पैसे मागत होती. तिच्या या सततच्या त्रासाला वैतागून मी तिचा महागाव मासेवाडी येथील जंगलात नेऊन गळा दाबून तिला ठार मारले त्यानंतर तिचा मृतदेह ओढयाच्या पात्रात टाकला. तसेच तिचे दागिने आणि मोबाईल ही काढून घेतल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेची लेखी फिर्याद मयत सुनिता हिचा पती संजय केसरकर याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार सुनिता संजय केसरकर (वय ४१) रा.भडगाव तालुका गडहिंग्लज हिचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी प्रविण चंद्रकांत चिचेंवाडी (वय३२) रा.भडगाव. तालुका गडहिंग्लज याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३(१)आणि इतर कलमान्वे गुन्हा दाखल केला. पोलीसांनी त्याला गडहिंग्लज येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून मयत सुनिता हिचे दागिने मोबाईल आणि त्याने गुन्हयात वापरलेली दुचाकी गाडी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास गडहिंग्लज पोलीस करीत आहेत.

## फेटेवाल्याचा अनैतिक सहवास...

कोल्हापुरात अनेक ठिकाणी कोल्हापुरी फेटे बांधण्याचे दुकाने आहेत. गणेश हुबाळे याचे ही कोल्हापुरातील बिंदु चौकात फेटे बांधण्याचे दुकान आहे मागील १३ वर्षापूर्वी त्याने स्वाती भाट हिच्याशी प्रेमविवाह केला. त्या दोघांची लगीन गाठ ही राजेउपाध्याय नगर येथे राहणाऱ्या गणेश हुबाळे याच्या भाचीने बांधली. त्यांना सध्या १२ वर्षाचा मुलगा तर ९ वर्षाची मुलगी आहे. तो राहयाला शनिवार पेठेतील म्हसोबा गल्लीत होता. रोज सकाळी तो दुकानत येत होता. दिवसभर व्यवहार करून तो रात्री उशिरा घरी परतत होता. गणेश याची फेटयाच्या दुकानातून कमाई ही मोठी होत होती म्हणून त्याने एके ठिकाणी प्लॅट ही घेतला होता. सर्व काही त्याचे व्यवस्थीत सुरळीत चालू होते. हल्ली गणेश हा दुकानातच जास्त वेळ थांबत होता तो घराकडे लवकर परत येत नव्हता या कारणातून स्वातीचे आणि त्याची रोज भांडणे होत असायची. स्वातीला हल्ली गणेशच्या वागण्याचे कोडे पडलेले होते. तो हल्ली दारू पिऊनच घरी येत होता. त्यातच तिला गणेशने आपल्या फेटे विक्रीच्या दुकानात एक सेल्सगर्ल ठेवलेली असून तिच्याबरोबर त्याचे तसेले संबंध असल्याची माहिती मिळाली होती. गणेश हा दुकानातील त्या महिलेच्या प्रेमात पडला होता. तो दुकानात बसून दुकान बंद करून तिच्याशी नको तसले अश्लिल चाळे ही करीत होता. तसा एक व्हिडीओ स्वातीला गणेशच्या मोबाईलमध्ये सापडला ही होता. या कारणातून रो नवरा बायकोची भांडणे होत होती. आपण गणेशबरोबर प्रेम विवाह करून चुकले की काय असे स्वातीला वाटत होते. कारण गणेश हा तसा बायकांच्या नादाला लागणाऱ्यातील होता हे तिला अलिकडेच समजले होते. तसेच तो दारू पित असल्याने दारूच्या नशेत तो काही ही करीत होता. दुकानातील महिलेबरोबर तो त्या संबंधात असल्याने गणेशने तिला सोन्याचे दागिने ही गिफ्ट केले असल्याची माहिती तिला मिळालेली होती. तो घरी आला की याचा जाब ती त्याला विचारीत होती. भांडणात गणेशने तिला सांगितले की, मी तिच्याशी आता दुसरे लग्न करणार आहे. तु मला नको आहेस तसेच मी घेतलेला मोकळा प्लॉट ही तिच्या नावे करणार आहे त्यामुळे नवरा दुसऱ्या बाईच्या प्रेमात वाहवत चालला आहे हे तिच्या लक्षात आल्यावर ती त्याच्याबरोबर भांडण काढत मोकळा प्लॉट आणि सोन्याचे दागिने कुठे आहेत म्हणून विचारीत होती. गणेश मात्र त्या महिलेच्या प्रेमात आकंठ बुडालेला होता. त्याचे हल्ली दुकानाकडे ही लक्ष नव्हते. दुकानातील सर्व व्यवहार ही ती महिलाच बघत होती. गणेशने फेटयाचे दुकानच तिच्या नावावर केल्यात जमा होते. तो तिला आपली दुसरी बायकोच मानत होती. तिची ही तो हरएक गरज पुर्ण करीत असल्याने ती ही गणेशला सोडायला तयार नव्हती. त्या दोघांच्या संबंधाची चर्चा ही बिंदु चौकात होऊ लागली. त्यामुळे स्वाती आता गप्प बसणाऱ्यातील महिला नव्हती. नवऱ्याने दुसरा संसार मांडलेला कोणत्या ही स्त्रीला मान्य नसतेच अगदी तसेच स्वातीचे ही झाले होते. ती रोज याचा जाब विचारीत त्या महिलेशी तुझा काय संबध आणि दागिने आणि प्लॉटचे काय केले असे विचारीत होती. आपल्या बायकोने आपल्याला उलट विचारावे हे गणेश हुबाळे याला पटत नव्हते. भांडणात तो हातात सापडेल त्या वस्तुने तिला मारहाण करीत होता. नवरा आपल्याला दुसऱ्या बाईसाठी मारहाण करतो त्रास देतो हे तिने आपल्या माहेरी राजोउपाध्यायनगर येथील भावाला सांगितले होते.तिचा भाऊ प्रवीण दगडू भाट याने ही भावोजी गणेश याला बऱ्याच वेळेला समजावून सांगितले होते. त्या बाईचा नाद सोडा. दुकानाकडे संसाराकडे लक्ष दया म्हणून विनंती केली होती. तरी ही गणेशच्या वागण्यात काही एक फरक पडला नाही. उलट तो दिवसे दिवस त्या महिलेसोबत दुकानातच अश्लिल चाळे करू लागला. त्या दोघांचा नंगा नाच दुकानात होत असल्याचे बघून स्वाती ही चवताळून उठली होती. एक तर त्या बाईचा नाद सोड नाही तर मला तरी सोड असे ती त्याला सांगत होती. परंतु एक वेळ ती आपल्या दोन्ही मुलांच्याकडे बघून संसारात गप्प राहत होती. नवरा बायकोची रोजची भांडणे ही पाचवीलाच पुजलेली होती. काही केल्या त्याची भांडणे मिटत नव्हती. दारूच्या नशेत गणेश हैवान होत होता. हातात सापडेल त्या वस्तुने तो स्वातीला जबर मारहाण करीत होता. खरे तर त्याचा स्वाभाव हा रागीट आणि चिडखोर होता. त्यामुळे त्याच्यात संयम नव्हता. शनिवार दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी गणेश हा रात्री दारू पिऊनच घराकडे आला. घरात आल्या आल्या त्यांची भांडणे सुरू झाली. भांडणात स्वातीने त्याच्याच मोबाईलमधील त्याचा महिले सोबतचा अश्लिल व्हिडीओ त्याला दाखवित या भवानीबरोबर दुकानात असले रंगीन चाळे करायला लाज वाटत नाही काय? घरात बायको मुले आहेत याचे जरा तरी भान ठेवा असे बोलून तिने त्याला उदया पासून ती बया दुकानात येता कामा नये मीच आता तुमच्या दुकानात बसणार आहे माझ्या ताब्यात मी दुकान घेणार आहे असे म्हटले. तिने त्याचा तो अश्लिल व्हिडीओ मुलासमोरच दाखविल्याने गणेशला स्वातीचा भयंकर राग आला. त्या रागात तो तिच्या अंगावर मारायला गेला. पहिल्यांदा हातात सापडेल त्या वस्तुने त्याने तिला जबर मारहाण केली. ती ओरडत खाली पडल्यावर तो तिच्या छातीवर बसला रागाच्या भरात त्याने तिचा गळा इतक्या जोरात आवळून धरला की तिला कसली ही जराही हालचाल करता आली नाही. तिचा गळा जोरात आवळ्याने तिच्या मुलानी बोंब मारली. तसे शेजारचे लोक त्याच्या घरात धावत आले. त्यानी कसे तरी करून त्याच्या तावडीतून स्वातीला सोडविले, परंतु जोरात गळा आवळला गेल्याने स्वातीने आपले डोळे पांढरे केले होते. या घटनेची माहिती शेजाऱ्यांनी स्वातीच्या भावाला दिली. तो ही या घटनेची माहिती मिळताच तातडीने शनिवार पेठेतील आपल्या बहिणीच्या घरी आला. तिची अत्यावस्था बघून त्याने लागलीच शेजाऱ्याच्या मदतीने स्वातीला कदमवाडीतील एका खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. तेथील डॉक्टरांनी तिच्यावर उपचार सुरू केले. गळा जोरात आवळ्याने श्वननलिकेला आणि स्वर यंत्राला जबर दुखापत झाली होती, दरम्यान तिच्यावर उपचार सुरू असताना खाजगी दवाखान्यात सोमवार दिनांक ९ फेब्रवारी २०२६ रोजी तिचा मृत्यु झाला. मयत स्वाती हिचा भाऊ प्रविण दगडू भाट याने या घटनेची माहिती लक्ष्मीपुरी पोलीसांना दिली. त्याने दिलेल्या तक्रारीत आपल्या बहिणीला तिच्या नवऱ्याने गळा आवळून मारल्याचे म्हटले. या घटनेनंतर गणेश हुबाळे हा फरार झाला होता. लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस त्याचा शोध घेत होते. या घटनेनंतर तो स्वत:ला लपवत इथे तेथे लपत होता. स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाला तो शासकीय रुग्णालयाच्या पिछाडीस असणाऱ्या अंधाऱ्या जागेत लपून बसल्याची माहिती मिळाली. लागलीच पोलीसांनी तेथे सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याला लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले. पो.निरी. श्रीराम कण्हेरकर यांनी त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. या घटनेची फिर्याद मयत स्वाती हिचा भाऊ प्रवीण दगडू भाट याने लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्यात दिली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीसांनी स्वाती गणेश हुबाळे (वय ३२) रा.शनिवार पेठ म्हसोबा गल्ली कोल्हापुर हिच्या खून प्रकरणी तिचा नवरा गणेश शंकर हुबाळे (वय ४०) रा.शनिवार पेठ म्हसोबा गल्ली कोल्हापुर याच्या विरोधात कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. लक्ष्मीपुरी पोलीसांनी त्याला कोल्हापुर येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर उभे केले असता मा.न्यायालयाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान त्याच्याकडून पोलीसांनी गुन्हयात वापरलेले वस्तु जप्त केली.या घटनेचा पुढील तपास लक्ष्मीपुरी पोलीस स्टेशनचे पो.निरी.श्रीराम कण्हेरकर याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

## वडिलांना शिवीगाळ केल्याने ...

शाबाज हा मामा अरबाज शेख याचेकडे सांगली येथील शामराव नगर राहयला आहे. तरी तो अधून मधून काही कारणास्तव इचलकरंजी येथे आपल्या मित्रांना भेटायला येत होता. सांगली येथे राहून देखील शाबाज याच्यात काही सुधारणा झाली नाही. काम मिळाले तरच तो करीत होता नाही तर तो इकडे तिकडे फिरून दिवस काढत होता. इचलकरंजी येथे शाबाज आला की तो आपल्या जुन्या मित्रांना भेटत होता. तसेच त्याचा आतेभाऊ आखिल मुजावर ही इचलकरंजी येथे राहयला असल्याने त्याच्याकडे ही शाबाज हा येत होता. आखिल मुजावर याचे सांगलीतील आसिफ जिल्लांनी यलकुंद्री आणि सोहेल सनदी हे मित्र होते. ते दोघे ही सांगलीतील शामरावनगर येथेच राहयला होते. यातूनच शाबाज शेख याची त्याच्याशी जवळची मैत्री झाली होती. ते चौघे ही इचलकरंजी किंवा सांगली येथे भेटून एकमेकासोबत बसून दारूची पार्टी करीत होते. त्यातच मागे एकदा शाबाज शेखे याचे आसिफ यल्लाकद्री याच्याबरोबर किरकोळ भांडण झाले होते. ते भांडण काही केल्या मिटलेले नव्हते. त्या भांडणाचा राग आसिफ याला होता. त्याच्यातील किरकोळ स्वरूपातील भांडणाने पेट घेतलेला होता. कारण नसताना ही शाबाज शेख हा आसिफ याला सारखा फोनवरून धमकावत होता. हे असिफ याच्या वडिलांना समजल्यानंतर त्यांनी शाबाज शेख याला आपल्या घरी बोलावून तु माझ्या मुलाला का? सारखे धमकावत आहेत तुमच्या दोघात काही देणे घेणे असले तरी सांग मिटवून घेऊया असे समजुतीने सांगितले परंतु त्या वेळी दारूच्या शाबज याने मित्र असलेल्या असिफ याच्या वडिलांना शिवीगाळ करीत त्यांना वाईट बोलले होते. ही गोष्ट असिफ घरी आल्यानंतर त्याच्या वडिलांनी असिफला सांगितली. आपल्या वडिलांना मित्राने शिवीगाळ केल्याचा राग असिफ याला आला. रागाच्या भरात असिफ हा त्यावेळी शाबाज याच्या घरी गेला. त्यावेळी शाबाज हा देखील दारूच्या नशेत असल्याने त्याचे भांडण परत वाढले. दोघात हाणामारी ही झाली. शाबाज याने असिफला जबर मारहाण केली. त्यानंतर आठवडा गेला. परंतु दोघांच्या मनात अजून ही धुसफुस होती. असिफने ही घटना इचलकरंजी येथे राहत असलेल्या शाबाज शेख याचा आतेभाऊ आखिल मुजावर याला सांगितली. त्यावेळी आखिल याने असिफ याला तु शाबाज घेऊन इचलकरंजी येथे ये. त्याची समजुत घालून तुमची भांडणे मिटवूया. त्यातच सोमवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सांगलीहुन इचलकरंजी येथे आला. इचलकरंजी येथे तो आपल्या आई वडिलांच्या मलाबादे नगरातील घरात रहायला होता. ही माहिती शाबाज याचा आतेभाऊ आखिल मुजावर याला मिळाली. त्याने ही माहिती सांगलीतील आसिफ यल्लकंद्री याला सांगितली. शाबाज हा इचलकरंजी येथे गेला आहे हे माहिती झाल्यावर असिफ हा आपला दुसरा मित्र सोहेल सनदी याला घेऊन मंगळवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी इचलकरंजी येथील असिफ याच्याकडे आला. त्यावेळी त्यांनी फुल्ल दारू पिली. शाबाज याचा कायमचा काटा कसा काढायचा याचा ते विचार करू लागले. संध्याकाळी आखिल याने शाबाज याला फोन करून आपण तुझी भांडणे मिटवूया, तसेच तु रात्री दारू प्यायला ये असे सांगितले. मंगळवारी आखिल याने सगळे नियोजन केले. रात्री उशिरा त्यांनी विक्रमनगर येथील एका वाईन शॉपीच्या दुकानातून दारूच्या तीन बाटल्या घेतल्या त्याच बरोबर स्नॅक्स आणि ग्लास ही घेतले. ते तिघे ही शाबाजला घेऊन रात्रीच्या अंधारातून दोन दुचाकी गाडीवरून शाबाजला घेऊन कृष्णानगरच्या समोरील रस्त्याने सोलगे मळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर महालक्ष्मी अपार्टमेंटच्या बाजूच्या निर्जन स्थळी आडोशाला आले. रस्त्यापासून काही अंतरावर आत मध्ये जात त्यांनी दारूची पार्टी करायला सुरूवात केली. प्रत्येकाचा एक दोन पेग झाल्यावर आखिल याने शाबाज याला तु असिफ के बाबा को क्या बोला रे तुने इनको गालीया क्यो दी, तुम्हारी उम्र के इनके आबाजान लगते है क्या असे विचारात शाबाज याच्याबरोबर भांडण काढायला सुरूवात केली. भांडणात शाबाज याने आपला आतेभाऊ आखिल याला तु क्यु हमारे बीच मै पडता है, मै देखता हु तो असे म्हणत असिफ याला वाईट शिवी दिली. त्याचा राग असिफ आणि आखिल या दोघांना आला. त्यांनी दारूच्या नशेत शाबाज याला मारायला सुरूवात केली.त्याला खाली पाडून मारत असताना सोहेलने शाबाज याचे हात पाय धरले. तर असिफ याने शाबाजचा आपल्या कडील रूमालाने गळा जोरात आवळला. त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न शाबाज हा करीत होता. अकेले मेरे के देख के तुम लोग मुझे मार रहे हो क्या.साला तुम्हारी मॉ का... म्हणत तो त्यांना शिवी देवू लागला. त्याचा गळा रूमालाने जोरात आवळला तरी त्याची काही हालचाल थांबेना म्हणून रागाच्या भरात असणाऱ्या असिफ याने जवळच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि शाबाजच्या चेहऱ्यावर दोन तीन वेळा मारला. त्यासरशी शाबाज याचा चेहरा पुर्ण पणे फुटला. त्याचा चेहरा त्यांनी त्या दगडाने पुर्णपणे विद्रुप केला. त्यात शाबाज शेख याचा जागीच मृत्यु झाला. त्यावेळी रात्रीचे १२ ते १ वाजून गेले होते. या संधीचा फायदा घेत ते तिघे ही तेथील दारूच्या बाटल्या, ग्लास आणि स्नॅक्स घेऊन आपल्या दुचाकीने पसार झाले. दुसऱ्या दिवशी बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी तेथून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना रस्त्याच्या कडेला आतील बाजूस एका तरूणाचा रक्ताने माखलेला मृतदेह पडला असल्याचे दिसले बघता बघता ही घटना परिसरातील लोकांना समजल्यावर तेथे बघ्यांची ही गर्दी झाली. कुणी तरी या घटनेची माहिती शहापुर पोलीसांना दिल्यावर घटनास्थळी शहापुर पोलीस ही दाखल झाले.पोलीसांनी घटनास्थळी श्वान पथकाला ही पाचारण केले.श्वान पथकाला रक्ताने माखलेल्या दगडाचा वास दिल्यावर श्वानाने सोलगे मळ्या पर्यतच माग दाखविला. मयत तरूण कोण आहे? त्याला इथे कुणी आणून मारले, तसेच मयत तरूणाचा चेहरा दगडाने ठेचलेला असल्याने त्याची ओळख ही पटविणे कठीण झाले होते. घटनास्थळी पोलीस उपाधिक्षक विक्रांत गायकवाड आणि पो.निरी सचिन सुर्यवंशी यांनी दाखल होऊन या घटनेची माहिती घेतली. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मयत तरूणाचा फोटो सोशल मिडियावर टाकला. पंचनाम्या नंतर सोशल मिडियावरील फोटो पाहून दुपारी मयताचे नातेवाईकांनी शहापुर पोलीसाशी संपर्क साधत मयत तरूण हा शाबाज शब्बीर शेख रा.सांगली शामराव नगर पूर्वी इचलकरंजी येथे तो रहात असल्याचे पोलीसांना सांगितले. तो पर्यंत पोलीसांनी मृतदेह इचलकरंजी येथील आयजीएम रुग्णालयात पोस्ट मार्टमसाठी पाठवून दिला. तेथे मयत तरूणाच्या नातेवाईकांना जाण्यास पोलीसांनी सांगितले. मयत तरूणाची ओळख पटल्यावर पोलिसांनी या घटनेची माहिती शाबाज शेख याचा मामा आरबाज शब्बीर शेख रा.सांगली याच्याकडून घेतली. त्यांनी पोलीसांना सांगितले की, गेल्या दोन दिवसापुर्वी मयत शाबाज हा सांगली इथून इचलकरंजी येथील आपल्या आई वडिलाकडे आला होता. तसेच त्याचे यापुर्वी सांगली येथील असिफ यल्लकंद्री याच्याबरोबर भांडण झाले होते. त्या भांडणात शाबाज याने आसिफ याच्या वडिलांना शिवीगाळ केली होती या भांडणाचा राग मनात धरून आसिफ याने आपल्या भाच्याला मारले असावे अशी शंका व्यक्त केली. या घटनेचा तपास शहापुर पोलीसा बरोबर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस ही करीत होते.त्यांना या घटनेतील संशयीत आरोपी हे सांगली येथील शामराव नगर येथे असल्याची माहिती मिळाल्यावर त्यांनी ते राहत असलेल्या ठिकाणी सापळा रचून असिफ यल्लकंद्री आणि त्याचा मित्र सोहेल सनदी यांना ताब्यात इचलकरंजी येथे आणून त्यांना शहापुर पोलीसांच्या ताब्यात दिले. शहापुर पोलीसांनी या दोघांच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा मान्य करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती देत या घटनेतील तिसरा संशयीत अरबाज मुजावर याचे नाव पोलीसांना सांगितले. शहापुर पोलीसांनी आखिल मुजावर याला इचलकरंजी येथील त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्याने ही आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची फिर्याद मयत शाबाज शेख याचा मामा अरबाज शब्बीर शेख रा.सांगली शामराव नगर याच्याकडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शहापुर पोलीस स्टेशन मध्ये शाबाज शब्बीर शेख (२५) रा.मुळ इचलकरंजी मलाबादे नगर, सध्या सांगली शामराव नगर याच्या खून प्रकरणी आसिफ जिल्लानी कलकुंद्री (२३) त्याचा मित्र सोहेल सनदी (२५) रा.दोघे ही सांगली शामराव नगर आखिल मुजावर (२८) रा.इचलकरंजी याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. शहापुर पोलीसांनी या तिघांना ही इचलकरंजी येथील प्रथमवर्ग कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने या तिघांना ही पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेल्या दोन दुचाकी, रुमाल आणि रक्ताने माखलेला दगड जप्त केला. या घटनेचा पुढील तपास शहापुर पोलीस स्टेशनचे पो.नि.सचिन सुर्यवंशी याच्या मार्गदर्शनाखाली शहापुर पोलीस करीत आहेत.

# विलास साखर कारखान्यावर ११,११,१११व्या साखर पोत्याचे पूजन

## नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांच्या सत्कार

**लातूर : वार्ताहर**

नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांनी आपल्या मतदारसंघात जाऊन नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घ्याव्यात. कोणतेही काम प्रलंबित राहणार नाही याची काळजी घेऊन, सामान्य माणसाची अडलेली कामे मार्गी लावावी आणि लोकांशी नाळ जोडावी, असे मोलाचे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले. लातूरच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेची भाग्यवाहिनी असलेल्या विलास सहकारी साखर कारखान्यात अत्यंत उत्साही वातावरणात ११ लाख ११ हजार १११ साखर पोती पूजन कार्यक्रम संपन्न झाला. या सोहळ्याचे औचित्य साधून लातूर आणि रेणापूर तालुक्यातील नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे, अनंतराव देशमुख (चेअरमन, रेणा साखर कारखाना), अशोक मुकूंदराव काळे (व्हा. चेअरमन, मांजरा कारखाना), धनंजय चंद्रसेन देशमुख (माजी चेअरमन, मांजरा कारखाना), ॲड. प्रमोद जाधव (व्हा. चेअरमन, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक), विजय गोविंदराव देशमुख (व्हा. चेअरमन, ट्वेन्टीवन शुगर), प्रविण पाटील (व्हा. चेअरमन, रेणा साखर कारखाना), कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील व कार्यकारी संचालक युनिट-२ ए.आर.पवार, तसेच



कारखान्याचे संचालक रविंद्र काळे, अमृत जाधव, अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, नितीन पाटील, गोवर्धन मोरे, रंजीत पाटील, रसुल पटेल, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, नेताजी साळुंके (देशमुख), रामराव साळुंके, दिपक बनसोडे, लताबाई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने, आबासाहेब पाटील व रमेश देशमुख आदी उपस्थितीत होते. यावेळी बोलतांना श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या की आपण केलेले कार्य कधीही पुसले जात नाही. लोकनेते विलासराव देशमुख साहेब व बब्रुवानजी काळे साहेब ४० वर्षापूर्वी मांजरा कारखाना उभारणीसाठी लागणारे शेअर्स खरेदी करावे म्हणून नागरीकांना आवाहन करीत होते, पण तेवढे पैसे गुंतवण्याची क्षमता शेतकऱ्यांकडे नव्हती. यानंतर सर्वामध्ये विश्वास संपादन करून कारखाने उभारले, हे काम पुसले जाणार नाही. याची माहिती तरूण पिढीला सतत दिली पाहिजे. शेजारचे जिल्हे पाहता त्यांच्या तुलनेत आपल्या जिल्हयात मांजरा परिवारातील कारखान्यांनी खूप चांगले काम केले आहे. जिथे आपण काम करतो, त्या संस्थेवर कर्मचाऱ्यांनी निष्ठा ठेऊन काम केल्यास आपल्या मेहनतीला यश येते असे त्या म्हणाल्या.या वेळी बोलताना खासदार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले मांजरा परिवारातील साखर कारखान्यांचे नाव सर्वत्र सन्मानाने घेतले जाते. लोकनेते विलासराव देशमुख यांनी लावलेला वटवृक्ष मोठा झाला आहे. ज्या दूरदृष्टीने साखर कारखाने उभारले. त्यासाठी पाण्याचे स्त्रोतही उभारले ते लोकनेते विलासराव देशमुख यांच्या दूरदृष्टीमुळेच, आजही त्यांनी उभारलेल्या बॅरेजेसमुळे शेतकऱ्यांच्या शेतीला मुबलक पाणी मिळत आहे. दरम्यान नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत मतदारांनी काँग्रेस आघाडी उमेदवारांना विश्र्वासाने निवडूण दिले आहे, त्यांच्या विश्वासाला तडा जाणार नाही असे काम नवनिर्वाचित जि.प. व पं. स. सद्स्यांनी करावे असे आवाहन खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी केले. यावेळी नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजय मिळवलेल्या लातूर व रेणापूर तालुक्यातील काँग्रेस आघाडीच्या सदस्यांचा कारखान्याच्या वतीने सन्मान करण्यात आला. यामध्ये जिल्हा परिषद सदस्या राजश्री देशमुख, महादेव मस्के, सोनाली थोरमोटे, भागीरथी पाटील, अश्विनी शिंदे, श्रीकांत (बाळू) माने, दिपाली आदमाने, दत्तात्रय टेकाळे, सौ. आशा भिसे आणि मनिषा कदम तर पंचायत समिती सदस्य तनुजा चव्हाण, सौ. प्रिया उफाडे, पुजा जाधव, शिवानी शिंदे, अक्षय देशमुख, सत्यनारायण पाटील, उध्दव जाधव, तात्याराव वाघमारे, बालाजी गोटके, विलास ऊफाडे, बाळासाहेब कदम, दिपाली कराड, शरयू गायकवाड, महेश चव्हाण, अमोल देडे, सुनंदा स्वामी, पुजा ढगे, गुरूनाथ गवळी सदस्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी केले. सुत्रसंचालन राहुल इंगळे पाटील यांनी केले. तर आभार संचालक तात्यासाहेब पालकर यांनी मानले. याप्रसंगी कारखान्याचे सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक शेतकरी आणि काँग्रेस आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिवंडीतील निसर्गोपचार तज्ञ स्वप्नील म्हात्रे यांचा आयुष पुरस्काराने सन्मान

**भिवंडी : वार्ताहर**



तालुक्यातील खारबाव व डोंबिवली येथील प्रसिद्ध निसर्गोपचार तज्ञ स्वप्नील प्रभाकर म्हात्रे यांना आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व विस्तार केंद्र राजकोट टीडीसी पीपीडीसी आग्रा या एमएसएमई मंत्रालय भारत सरकारशी संलग्न असलेल्या संस्थेच्या वतीने अतिशय प्रतिष्ठेचा आयुष महासन्मान पुरस्कार २०२५ ने गौरविण्यात आले. नवी मुंबई तेथे पार पडलेल्या भव्य कार्यक्रमात सिनेअभिनेत्री श्रेया बुगडे व आमदार श्वेताताई महाले यांच्या हस्ते म्हात्रे यांना हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी युनायटेड नेशन चाईल्ड वुमेनचे सल्लागार तथा भारत सरकारच्या स्वास्थ व परिवार कल्याण मंत्रालययाचे माजी सहाय्यक महानिर्देशक डॉ.मंगला कोहली, डॉ.प्रवीण जोशी, डॉ.प्रणवपंडया, डॉ.नितीनराजे पाटील, डॉ बाबुराव कानडे, डॉ.दिशा चव्हाण, डॉ.प्रशांत सावंत, डॉ.रवी शिंदे, डॉ.रचित म्हात्रे, डॉ.जनार्धन यादव यांच्यासह देशभरातील शेकडो आयुष चिकित्सक व थेरपिस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयुर्वेद, योग नेचरोपैथी, होमियोपैथी, युनानी, सिद्ध, एक्युपंचर, एक्युप्रेशर अशा विविध आयुष क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या चिकित्सकांना व थेरपिष्ट यांना हा पुरस्कार देण्यात येतो. निसर्गोपचार तज्ञ स्वप्नील म्हात्रे यांनी आपल्या श्री मेख आयुर्धामच्या माध्यमातून आयुर्वेदिक व नैसर्गिक पद्धतीने शेकडो रुग्णांचे आजार बरे केले असून त्यांच्या या कार्याची दखल आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनने घेत त्यांना आयुष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# महाराष्ट्रातील राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ७ जागांसाठी १६ मार्चला होणार मतदान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, यामध्ये महाराष्ट्रातील ७ जागांचा समावेश आहे. या रिक्त होणाऱ्या जागांसाठी येत्या १६ मार्च २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. महाराष्ट्रासोबतच ओडिसा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतील रिक्त होणाऱ्या जागासाठी ही निवडणूक होणार आहे. महाराष्ट्रातील राज्यसभेचे सदस्य असलेले डॉ. भागवत किशनराव कराड, डॉ. फौजिया तहसीन अहमद खान, प्रियंका विक्रम चतुर्वेदी, शरदचंद्र गोविंदराव पवार, धैर्यशील मोहन पाटील, रजनी अशोकराव पाटील आणि रामदास आठवले या सात सदस्यांचा कार्यकाळ २ एप्रिल रोजी संपणार आहे. या निवडणुकीची २६ फेब्रुवारी रोजी अधिसूचना जारी केली जाईल, तर उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ५ मार्च २०२६ असेल. अर्जांची छाननी ६ मार्च रोजी केली जाणार असून ९ मार्चपर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येतील. मतदान १६ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाईल. मतदानासाठी निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या विशेष जांभळ्या स्केच पेनचाच वापर करणे बंधनकारक असेल असे आयोगाने स्पष्ट केले आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २० मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत.

# देवणी तहसीलसमोर शेतकरी कुटुंबाचे आमरण उपोषण

**देवणी : वार्ताहर**

प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही न्याय न मिळाल्याने अखेर देवणी तालुक्यातील आंबेगाव येथील शेतकरी मधुकर एकनाथ काटमपल्ले यांनी आपल्या संपूर्ण कुटुंबासह व गुरा ढोरासह देवणी तहसील कार्यालयसमोर दि. ११ फेब्रुवारी २०२६ पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. शेतजमीन बळकावण्याचा कट रचण्यात आला असून, आपल्या कुटुंबाच्या जीवितास गंभीर धोका असल्याचा अत्यंत गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

मधुकर काटमपल्ले यांची मौजे आंबेगाव येथे गट नं.२०/ब/२ मध्ये सामायिक मालकीची शेतजमीन आहे. या जमिनीत त्यांनी मेहनतीने उसाची लागवड केली होती. मात्र दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी शेजारील काही व्यक्ती व एका साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांनी संगनमत करून बेकायदेशीररीत्या त्यांच्या शेतात प्रवेश केला. कष्टाने पिकवलेला ऊस स्वतःचा असल्याचे भासवून तो थेट कारखान्याला पुरवण्यात आल्याचा आरोप तक्रारीत



करण्यात आला आहे. या प्रकरणी मधुकर काटमपल्ले व त्यांचे पुत्र नरसिंग काटमपल्ले यांनी देवणी पोलीस स्टेशन, उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा केला. पोलीस निरीक्षकांनी कारवाईबाबत पत्र दिले असले, तरी आजतागायत प्रत्यक्ष पंचनामा देखील करण्यात आलेला नाही, असा गंभीर आरोप तक्रारदाराने केला आहे. उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी महसूल व भूमी अभिलेख विभागासह संयुक्त कारवाईचे स्पष्ट आदेश दिले; मात्र त्याची अंमलबजावणी कागदावरच मर्यादित राहिली आहे. पोलीस अधीक्षकांच्या सूचनांनंतरही स्थानिक पातळीवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशयाचे ढग दाटले आहेत. विरोधी गटाकडून जबरदस्तीने जमिनीचा ताबा घेण्याचा तसेच कुटुंबास गंभीर इजा पोहोचवण्याचा धोका असल्याचा दावाही तक्रारदाराने केला आहे. दिवाणी व फौजदारी न्यायालयात दावे दाखल करूनही परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याने, शेवटचा पर्याय म्हणून आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागत आहे, असे मधुकर काटमपल्ले यांनी स्पष्ट केले. मला किंवा माझ्या कुटुंबाला काहीही अनुचित घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महसूल व पोलीस प्रशासनाची असेल, असा थेट इशाराही त्यांनी दिला आहे.

# वसईतून चोरीला गेलेल्या स्कुटीवरुन सात गुन्हे उघडकीस पोलिसांना यश!

**वसई : वार्ताहर**

वसईतल्या महिलेची चोरीला गेलेली स्कुटी पोलिसांनी शोधताना सदर स्कुटीसह आणखी सात गुन्हे उघडकीस आले आहेत. स्कुटी चोरणारा इसम व त्याच्यासह दोन भंगार व्यावसायिकांनाही अटक करण्यात आलेली आहे. प्रीती गुरुगिरी रा.कोळीवाडा वसई या महिलेची काही दिवसांपूर्वी स्कुटी चोरीला गेली होती.

सदर बाबत वसई पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात इसमा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. पोलिसांनी सीसीटीव्हीचा आधार घेत या प्रकरणी तपास सुरू केला असता एक इसम मास्क लावून टोपी घालून सदरची स्कुटी चोरून घेऊन जात असताना आढळून आला. तपासात सदरचा इसम माणिकपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका गुन्ह्याकरिता अटक असून ठाणे कारागृह बंदिस्त असल्याची माहिती प्राप्त झाली. रुमालिन अहमद अली हवालदार (३९) रा.वाझा मोहल्ला, पापडी वसई असे अटक




आरोपीचे नाव आहे. दि. ९ फेब्रुवारी रोजी वसई पोलिसांनी त्यांचा ताबा घेऊन तपास केला. यात आणखी सात गुन्हे उघडकीस आलेले आहेत. सदर आरोपीने नालासोपारा माणिकपूर आचोळे व वसई परिसरात गुन्हे केलेले आहेत येथून स्कुटी चोरून भंगार व्यावसायिक हरी सिंह केशर सिंह (४०) रा. मनवेल पाडा विरार, विनोद यादव (३२) रा. ओम नगर ,वसई यांना विक्री करीत असे. त्यांच्याकडून चोरीला गेलेली स्कुटी व ८२ हजार ७०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आलेला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण घाडीगावकर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा व अन्य पोलीस कर्मचाऱ्यांनी तपास करून वसईतील सदर चोरट्यांना गजाआड केलेले आहे.

# दालन देण्यात दूजाभाव केल्यामुळे महापालिकेच्या पहिल्याच महासभेत भाजप नगरसेवकांचा गोंधळ!

**विरार : वार्ताहर**

वसई विरार महापालिकेची पहिली महासभा आज पडत आहे. यासाठी बहुजन विकास आघाडी आणि भाजपचे नगरसेवक पालिकेच्या मुख्य सभागृहात जमा झाले आहेत. मात्र, भाजप पक्षाच्या निवडून आलेल्या नगरसेवकांसाठी दालन देण्याच्या मागणीवरून पहिल्याच सभेत भाजप नगरसेवकांनी आणि कार्यकर्त्यांनी गोंधळ घातल्याचे पाहायला आले होते. वसई विरार महापालिका निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत बहुजन विकास आघाडीने ७० जागा, भाजपने ४३, शिवसेनेने (शिंदे गट) आणि काँग्रेसने प्रत्येकी एक एक जागा मिळाली आहे. यामुळे इतक्या वर्षात पहिल्यांदाच बहुजन विकास आघाडीसमोर विरोधकांचे आव्हान उभे राहिले आहे. तसेच पालिकेची पहिली महासभा सुरू होण्यापूर्वी भाजपचे



गटनेते अशोक शेळके यांनी महापालिकेत भाजप नगरसेवकांसाठी कार्यालय असावे अशी मागणी केली होती. तर महासभेच्या पूर्वी भाजप नगरसेवकांनी आणि कार्यकर्त्यांनी हातात फलक घेऊन आणि घोषणाबाजी करत आयुक्तांच्या कार्यालयाला घेराव घातला होता. ४३ नगरसेवक निवडून आल्यानंतरही अद्याप पक्षातील नगरसेवकांसाठी स्वतंत्र दालन किंवा कार्यालयाची सोय करण्यात आलेली नाही. जनतेने आम्हाला निवडून दिले आहे. नागरिक कामासाठी आमच्याकडे येणारच. त्यामुळे आम्हाला कार्यालय हवेच अशी मागणी गटनेते अशोक शेळके यांनी केली होती. तर यासंबंधी वसई विरार महापालिकेत आंदोलन करण्यात आले होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, दालनाच्या मागणीसंबंधी सात दिवसांपूर्वी आम्ही आयुक्तांना पत्र दिले होते. पण, त्यांनी अजूनही त्यावर उत्तर दिलेले नाही. हा लोकप्रतिनिधींचा अपमान आहे. आयुक्त लोकप्रतिनिधींचा अपमान करतात, असा आरोपही त्यांनी केला.

# शिवजयंती निमित्त शिवप्रतिष्ठानच्या तरुणांनी शिऊरकरांना दिली विंधन विहिर भेट

**निलंगा : वार्ताहर**

शिवजयंती म्हटले की जल्लोष, डीजेचा आवाज, मिरवणूका, मोटारसायकल रॅली पण निलंगा तालुक्यातील शिऊर गावात एक आगळा वेगळा स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवविण्यात आला आहे. पाणी प्रश्न लातूर जिल्ह्यात सातत्याने गंभीर असतो. पाणी हे जीवन आहे. याचे सामाजिक भान ठेवून शिवप्रतिष्ठानने शिवजयंती निमित्त शिऊर गावात विंधन विहीर घेऊन ती गावाकऱ्यांना गिफ्ट केली. विशेष म्हणजे या विंधन विहिरीला चक्क ४ इंच इतके पाणी लागले आहे. त्यामुळे शिऊरकरांना 'जीवन' मिळाले आहे. उन्हाळ्यातल्या पाणी टंचाईवर त्यांना आता मात करता येणार आहे. यावेळी संगमेश्र्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे आशिष शिवराज आष्टुरे आणि युवा उद्योजक गोपाळ पाटील यांनी गावकऱ्यांना अन्नदान करून छत्रपती शिवरायांचा जयघोष करीत शिवजयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला. विंधन विहिरीतून येणाऱ्या पाण्याच्या फवाऱ्यामुळे गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद ओसंडून वाहत होता. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

निलंगा तालुक्यातील शेवटचे टोक म्हणजे शिऊर गाव. येथील 'शिवप्रतिष्ठान नवतरुण मंडळाने' यंदा एक वेगळाच आदर्श समाजासमोर ठेवला आहे. मिरवणुकीवर



होणारा लाखो रुपयांचा खर्च टाळून मंडळाने गावात पिण्याच्या पाण्यासाठी विंधन विहीर खोदून गावाची तहान भागवण्याचा संकल्प पूर्ण केला आहे. शिवजयंतीच्या या अनोख्या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे. शिवप्रतिष्ठानच्या तरुणांनी कुठलाही बडेजाव टाळून समाजहिताला प्राधान्य दिले आणि सामाजिक बांधिलकी जोपासली. दरवर्षी मंडळाच्या वतीने मिरवणुकीवर मोठा खर्च केला जायचा. मात्र, यंदा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत 'डीजे'च्या तालावर नाचण्यापेक्षा ग्रामस्थांची तहान भागवायचा निर्णय घेतला. शिवजयंती उत्सवाचा निधी गोळा करून गावात एका मोक्याच्या ठिकाणी विंधन विहीर खोदण्यात आली. या विंधन विहीरीचे भूमिपूजन भारतीय सैन्य दलातील सेवानिवृत्त ले. कर्नल सचिन रंडाळे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. शोर्य चक्र व सेना पदक मिळालेले ले. कर्नल सचिन रांडळे आणि कीर्ती चक्र पदक विजेते सुभेदार संतोष राळे यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दोन्हीही लष्कर अधिकाऱ्यांनी शिऊरच्या तरुणाचे सदर उपक्रमाबद्दल कौतुक केले.

सुभेदार संतोष राळे यांनी सैन्यातील आपले अनुभव कथन करून त्यांनी व त्यांच्या टीमने १८ अतिरेक्यांचा कसा खात्मा केला ते विशद केले. त्यांचे प्रेरणादायी असे भाषण झाले. केवळ एक दिवसाचा उत्सव न करता गावाला कायमस्वरूपी पाण्याची सोय करून दिली. ध्वनी आणि वायू प्रदूषणाला पूर्णपणे फाटा दिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे हित जपले, तोच वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न या गावचा तरुण वर्ग करत आहे.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय**
**(महसूल शाखा)**

किल्लाबंदर रोड, मालोंडे, वसई गांव, ता. वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१ २०१
दुरध्वनी क्रमांक : (०२५०) २३२२००७

क्र.मशा/कक्ष-१/फौजदारी/कावि-९२/२०२५
दिनांक : ०९/१२/२०२५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक : ९२/२०२५
**श्रीम. नुरजहाँ युनुस मेमन** .... **अर्जदार**

**विरुद्ध**

**१) सहा. आयुक्त**
**वसई-विरार शहर महानगरपालिका, ता.वसई, जि.पालघर** .... **सामनेवाले**
**२) ग्रामपंचायत कार्यालय,**

ज्याअर्थी वरील अर्जदार त्यांचा मुलगा **कै. उस्मान युनुस मेमन** ह्यांचा मृत्यू दिनांक ०८/०९/२०१७ रोजी पेल्हार ता. वसई, जि. पालघर येथे झाला असून त्याच्या मृत्यूची नोंद करण्याबाबत आदेश मिळण्याकरीता या कार्यालयात अर्ज क्रमांक ९२/२०२५ दाखल केलेला आहे. या कोणी इसमास हरकत असेल देण्याबाबत जर कोणत्याही इसमाची हरकत दाखल न झाल्यास योग्य ते पुरावे व कागदपत्र घेवून अर्जदार यांनी मृत्यूची नोंद करण्याबाबत आदेश देण्यात येईल यांची कृपया नोंद घेण्यात यावी.

आज दिनांक ०९/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली आहे.

शिक्का

**सही/-**
**तहसीलदार वसई करिता**

23 FEBRUARY TO 01 MARCH 2026 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 2/21/2026 8:59 PM Page 1



# राजकारणाची बुधवारपेठ!

एक काळ असा होता की राजकारणात चारित्र्यवान आणि ध्येयवादी लोक होते. याचे कारण राजकारणातील बहुतेक लोक हे स्वातंत्र्यसेनानी असल्याने ते पूर्णपणे देशासाठी समर्पित होते. त्यांनी इंग्रजांच्या विरुद्ध लढून स्वातंत्र्य मिळवलेले असल्याने त्यांना स्वातंत्र्याचे महत्व कळत होत. त्यामुळे लढून मिळवलेले स्वातंत्र्य जनतेच्या विश्वासावर कसे टिकेल यासाठीच त्यांनी हयात वेचली. त्यांच्यासाठी देश आणि स्वातंत्र्य महत्वाचे होते. त्यामुळे त्यांनी कधीही स्वतःचा विचार केला नाही. आज कोट्यवधींच्या बंगल्यात राहणारे मंत्री संत्री आणि पंतप्रधान आलिशान आयुष्य जगत आहेत. तर त्यावेळचे पंतप्रधान भाड्याच्या खोलीत रहायचे. तत्कालीन हंगामी पंतप्रधान गुलजारीलाल नंदा यांनी वेळेवर भाडे भरले नाही म्हणून घरमालकाने त्यांचे सामान घराबाहेर काढले पण त्यांनी कधीही स्वतःचे घर घेण्यासाठी वेडी वाकडी कामे केली नाहीत. पण आज मात्र सारे काही बदलले आहे. आज राजकारणाचा अक्षरश वेश्याव्यवसाय झाला आहे. सत्तेसाठी कोणी कुणाचीही शय्यासोबत करायला तयार असतो. मतदारांना फसवणे हा तर आमचा जन्मसिद्ध हक्क आहे असे म्हणत आजचे लोकप्रतिनिधी निवडणूक झाली आणि निवडून आले की ज्याच्या विरुद्ध निवडणूक लढवली त्याच्या पक्षात जातात. अशावेळी ज्यांनी आपल्याला मते दिली त्या मतदाराला काय वाटेल याचा ते जराही विचार करीत नाहीत.

नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ही बघायला मिळाले. कल्याण डोंबिवलीत ज्या एकनाथ शिंदेंच्या पक्ष विरुद्ध मनसेने निवडणूक लढवली. त्याच एकनाथ शिंदेंच्या पक्षाला निवडणुकीनंतर त्यांनी पाठिंबा दिला. भाजपाने अनेकांचे पक्ष फोडले पण करावे तसे भरावे अशी एक म्हण आहे. भाजपाने जे इतर ठिकाणी केले त्यांचे परिणाम त्यांना भिवंडीत भोगावे लागले. भिवंडीत भाजपाच्या १२ नगरसेवकांनी चक्क काँग्रेस आघाडीला पाठिंबा दिला. आता इतर ठिकाणी सुधा असेच होणार. म्हणूनच राजकारण हा वेश्याव्यवसाय झालं असे नाईलाजाने म्हणावे लागते. कारण सत्तेसाठी कोणासमोरही तंगड्या दाखवायला राजकारणी तयार होतात त्यामुळे त्यांच्यावर कुणीही यापुढे विश्वास ठेवू नये. निझामपूर महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी झालेल्या निवडणुकीत भाजपच्या बंडखोरांनी बाजी मारली आणि भाजप नेत्यांना त्यांची जागा दाखवून दिली. आतापर्यंतच्या अनेक वर्षांच्या इतिहासाकडे पाहिल्यास, भिवंडी महानगरपालिका मध्ये प्रामुख्याने अल्पसंख्यांक समाजातील महापौर निवडून येत असल्याचे चित्र दिसून आले आहे. मात्र यंदा हे समीकरण बदलताना दिसत आहे.

दरम्यान, भाजपकडून महापौर पदाचे इच्छुक उमेदवार असलेले नारायण चौधरी यांनी भाजपसोबत न जाता सात नगरसेवकांचा स्वतंत्र गट स्थापन केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या गटाने काँग्रेस पक्षाला पाठिंबा दिला असून या आठ जणांच्या गटापैकीच काँग्रेससोबत सहभागी होऊन त्यांच्यातीलच एखादा नगरसेवक महापौर होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. भाजपने प्रथम नारायण रतन चौधरी (नारायण चौधरी) यांना महापौरपदासाठी उमेदवारी दिली होती. नंतर अचानक स्नेहा मेहुल पाटील यांना उमेदवारी दिली. यामुळे नारायण चौधरींनी भाजपाच्या नाराज नगरसेवकसेवकांसहीत 'भिवंडी सेक्युलर फ्रंट'मध्ये प्रवेश करत काँग्रेसला पाठिंबा देण्याच्या हलचाली सुरु केल्या. त्यामुळेच काँग्रेस + राष्ट्रवादी + बंडखोर भाजप गट = ५१+ जागा होत असल्याने हे समीकरण तसेच बहुमत निश्चित मानलं जात आहे. ही भाजपाचीच रणनिती? या घडामोडींमुळे यंदा भिवंडी महानगरपालिकेत अल्पसंख्यांक महापौर न होता वेगळेच राजकीय चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे ही संपूर्ण राजकीय हालचाल भाजपचीच एक रणनीती असू शकते अशा चर्चानाही राजकीय वर्तुळात उधाण आले होते.

आता प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी काय होणार याकडे सर्वांचे लक्ष होते. पण अखेर भाजपतील चाणक्यांनी इथे माती खाल्ली आणि भाजपचा त्यांच्याच नगरसेवकांनी पराभव केला. इथेही चंद्रपूर पॅटर्न पद्धतीने अखेरच्या खेळीत भाजपाल त्यांच्याच नगरसेवकांनी चितपट केले आणि करावे तसे भरावे याची प्रचिती दाखवून दिली. भिवंडीत भाजपाच्या झालेला पराभव ही चंद्रपूरची परतफेड आहे. त्यामुळे या परतफेडीतून भाजपाने भविष्यात तरी धडा घ्यायला हवा. पण जोवर आपली संपत्ती वाचवण्यासाठी काही आर्थिक गुन्हेगार सतेसोबत भाजपाच्या मांडीला मंदी लावून बसलेले आहेत तोवर फोडाफोडीचे राजकारण सुरूच राहणार त्यामुळे कुठल्याही सज्जन माणसाने भविष्यात आपल्या मुला बाळांना राजकारणात पाठवू नये. कारण राजकारणाचा अक्षरश कोठा झालाय. अशावेळी तिथे गेलेला माणूस कधी कुणाशी सोयरिक करील याचा नेम नाही. मात्र हे सर्व उघड्या डोळ्यांनी पाहण्या शिवाय सामान्य माणसाच्या हाती काहीच राहिलेले नाही. सामान्य माणूस केवळ मतदान करण्यापुरताच शिल्लक उरलाय. आजच्या स्थितीत सामान्यवमांसाची स्थिती गांधीजींच्या त्या तीन माकडांसारखी आहे.ज्याने तोंड असून बोलू नये. डोळे आणून पाहू नये आणि कान असून ऐकू नये. आपण स्वतंत्र भारतात राहतोय हेच मनातून काढून टाकावे. स्वातंत्र्य केवळ कागदावर आहे आणि ते कागदावरच राहील.

# मानवता धर्म जोपासणारा 'बंजारा समाज'




भारतीय सामाजिक-आर्थिक इतिहासात बंजारा समाजाचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. मध्ययुगीन काळात संपूर्ण भारतभर व्यापार, वाहतूक आणि पुरवठा व्यवस्था सांभाळणारा हा समुदाय केवळ आर्थिकच नव्हे, तर धार्मिक-सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वाची भूमिका बजावतो. शीख इतिहासातील लखीशाह (लाखा) बंजारा यांचे योगदान हे त्याचे सर्वोत्तम उदाहरण मानले जाते. श्री गुरु तेगबहादुर साहेब जी यांच्या शहीदीनंतर सेवा, तसेच त्या काळातील बंजारा समाजाचे व्यापारी सामर्थ्य, हे दोन्ही घटक शीख-बंजारा संबंधांचे सशक्त द्योतक आहेत.

**लखीशाह बंजारा यांचे शीख समाजातील महत्त्व**

इ.स. १६७५ मध्ये मुघलची सत्तेने श्री गुरु तेगबहादुर साहेबजी यांचा अनन्वित छळ केला त्यामध्ये ते शहीद झाले. त्या काळात भयावह वातावरण होते; कोणालाही गुरुजींच्या पार्थिवाला स्पर्श करण्याची हिंमत होत नव्हती. अशा वेळी लखीशाह बंजारा, जे एक नामांकित व्यापारी व कारवाँ प्रमुख होते, त्यांनी एकाच वेळी हजारो बैलगाड्या एकत्रित केल्या. आपल्या जीवाची पर्वा न करता गुरुजींचे पवित्र शरीर आपल्या गाडीत लपवून दिल्लीतील रायसीना परिसरात नेले. एकाच वेळी आलेल्या हजारो बैलगाड्या त्यांनी उडालेला धुराळा यामुळे त्यांच्या मनातील पवित्र कार्य कोणाच्या लक्षात आले नाही. नंतर आपल्या घराला आग लावून त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले, जेणेकरून मुघल अधिकाऱ्यांना संशय येऊ नये. आजचे गुरुद्वारा रकाब गंज साहिब हे त्याच बलिदानाची साक्ष देणारे पवित्र स्थळ आहे. या ठिकाणी एक भव्य सभागृह आजही त्यांच्या नावाने उभे आहे. या घटनेमुळे लखीशाह बंजारा हे शीख परंपरेत त्याग, निष्ठा आणि मानवतेचे प्रतीक ठरले आहेत.

**श्री गुरु तेगबहादूर साहेबजींच्या कार्यात सहभाग**

गुरु तेगबहादूर साहेबजी हे धार्मिक स्वातंत्र्य, मानवाधिकार आणि सर्वधर्मसमभावाचे पुरस्कर्ते होते. काश्मिरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी त्यांनी प्राणांची आहुती दिली. लखीशाह बंजारा यांनी केलेली सेवा ही गुरुजींच्या मूल्यांचीच पुनरावृत्ती होती.धर्मापलीकडे जाऊन मानवतेसाठी उभे राहणे, ही शिकवण त्यांनी आपल्या कृतीतून दिली. म्हणूनच शीख परंपरेत बंजारा समाजाला सेवाभावी सहचर म्हणून सन्मान दिला जातो. ३५० वर्षांपूर्वीचा बंजारा समाजाचे व्यापारी महत्त्व मुघल काळात बंजारा समाज हा उपखंडातील सर्वात मोठा स्थलांतरित व्यापारी वर्ग मानला जात असे. धान्य, मीठ, कापड, कच्चा माल आणि लष्करी पुरवठा हे मुख्य व्यवसाय. त्या काळातील असुरक्षितता आणि लुटालुट लक्षात घेऊन या समाजाने समुदायातून व्यापार केला.स्वसंरक्षण आणि त्यासाठी आवश्यक शस्त्रकला यामध्ये हा समाज पारंगत होता. भटकंती संदर्भातील रस्ते, जोखीम आणि प्रसंगी लढण्याचे कसब त्यांना अवगत होते. देशाटन करण्याची कला या समुदायाने विकसित केली होती. मोठ्या बैलगाड्यांच्या तांड्यांद्वारे (कारवाँ) हजारो किलोमीटरचा प्रवास केला जात असे. मुघल लष्कराचा अन्नपुरवठा प्रामुख्याने बंजाऱ्यांकडून होत असल्याची नोंद तत्कालीन प्रशासनिक कागदपत्रांत आढळते. दुष्काळी परिस्थितीतही अन्नधान्याची वाहतूक करून त्यांनी राजकारभार स्थिर ठेवला. बंजारा समाजाची व्यापार व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध होती. प्रत्येक तांड्याला नायक, कारभारी आणि राखणदार असत. मार्ग, पाणवठे, विश्रांतीस्थळे यांची पूर्वनियोजित माहिती त्यांना असे. व्यवहार बहुधा विश्वासावर आधारित, पण ठराविक संकेत आणि मौखिक करारांवर चालत. ही व्यवस्था आजच्या लॉजिस्टिक्स सिस्टीमची आद्य आवृत्ती मानली जाते. त्यांच्या तांड्याची रचना व त्यातून कामाचे वाटप यामुळे अनेक वर्ष हा समुदाय शिस्तबद्ध व्यापारी समुदाय म्हणून सन्मानित केला जातो. या समाजाकडे असणाऱ्या दळणवळण, मनुष्यबळामुळे तत्कालिन राजकीय चौकटीत या समाजाला फार महत्व प्राप्त झाले होते.

**हिंदू समाजातील बंजारा समुदायाचे महत्त्व**

बहुसंख्य बंजारा समाज हिंदू परंपरेत मोडतो. सण, उत्सव, चालीरीती आणि त्यांचे वार्षिक नियोजन यामुळे या समाजाच्या मान्यतांना विविध समाजात प्रतिष्ठा प्राप्त होती.स्वतःची भाषा, संगीत, खानपान पद्धती, आयुर्वेद व औषध शास्त्राचे उत्तम जाण यामुळे त्यांना अन्य समाजात प्रतिष्ठा होती. त्यांनी देशभरच्या ग्रामीण-शहरी भागांना जोडण्याचे काम केले. स्थानिक बाजारपेठा, मंदिरे, यात्रास्थळे आणि राजकीय केंद्रे यांना आवश्यक वस्तू पुरवून सामाजिक एकात्मता वाढवली. देशभरातील स्वतःच्या समाजातील उत्सव सोबतच अन्य धर्मीयांच्या उत्सवाची माहिती व त्या दृष्टीचे बिनचूक वार्षिक नियोजनामुळे बंजारा समाज हा केवळ व्यापारी नसून, सांस्कृतिक दुवा ठरला, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**भाषा, पेहराव आणि अखिल भारतीय सूत्र**

बंजारा समाजाची गोरबोली (लामणी/लभाणी) ही भाषा संपूर्ण भारतात वेगवेगळ्या प्रादेशिक प्रभावांसह आढळते. हा एक अखिल भारतीय भाषिक सूत्र आहे. स्त्रियांचा रंगीबेरंगी पोशाख, भरजरी दागिने, पुरुषांचा साधा पण प्रवाससुलभ पेहराव, हे सर्व त्यांच्या स्थलांतरित जीवनशैलीशी सुसंगत होते. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत या समाजाने आपले वैशिष्ट्य, भाषा, पेहराव, खानपान यामध्ये एकसूत्री पण ठेवले. कोणत्याही ठिकाणच्या बंजारा समाजाच्या भाषा आणि राहणीमान हे एक दुसऱ्यांसोबत कितीही वर्ष विलग राहिले तरी बदलू न देण्याची हजारो वर्ष परंपरा त्यांनी जपली. अनेक धर्माचे अनेक पंथाचे व चालीरितीचे शासन आले तरी त्यांनी आपली संस्कृती जतन केली. त्यामुळे हा समाज सर्वकालीन समाज व्यवस्थेत देशाच्या कानाकोपऱ्यात आपल्या सन्मानाने आणि लढवय्या बाण्यामुळे तटस्थ आणि वेगळेपण अधोरेखीत करीत गेला. लखीशाह बंजारा हे केवळ धार्मिक सेवक नव्हते; ते त्या काळातील यशस्वी व्यापारी होते. दिल्लीसारख्या राजधानीत त्यांचे निवासस्थान आणि व्यापारी जाळे होते. तीन ते चार शतकांचा व्यापाराचा त्यांचा अनेक पिढयांचा अनुभव होता. आपल्या मेहनतीने, प्रामाणिकपणाने आणि व्यापार पूरक साहित्य-सुविधांनी त्यांनी गौरवशाली परंपरा निर्माण केली होती. स्वतःचा एक समुदाय, व्यापाराचा वकूब, शब्दाला जपण्याची स्थिरता, धर्माचा स्वाभिमान, व्यवहारातील पारदर्शिता, वक्तशीरपणा आणि लढाऊ वृत्तीमुळे आदर युक्त दहशत या समाजाची तत्कालीन व्यवस्थेत होती. त्यामुळेच गुरुजींच्या पार्थिवाला सुरक्षितपणे हलवणे त्यांना शक्य झाले.

**शीख आणि बंजारा समाजाचा संबंध**

लखीशाह बंजारा यांच्या कृतीमुळे शीख-बंजारा संबंध दृढ झाले. पुढील काळात अनेक बंजारा कुटुंबे शीख गुरुद्वारांच्या सेवेत सहभागी झाली. देशभरातील दोन्ही समाजांचा वावर. ठिकठिकाणी व्यापारासाठी व धर्मप्रसारासाठी जाणारे जत्थे व तांडे यातील स्थलांतर हा समान धर्म. विविध वातावरणात अस्तित्व टिकवण्याची परस्पर सांगड. लंगर व्यवस्था, प्रवासातील मदत आणि आपत्कालीन सेवा या क्षेत्रांत दोन्ही समाजातील साम्य या समुदायाला सहजीवनासाठी उपयुक्त ठरला. त्यामुळे देशात या दोन्ही समुदायाने तत्कालीन व्यवस्थेत समान धर्मीय म्हणून मान्यता प्राप्त केले होती.

ही व्यवस्था दोन्ही समुदायांच्या संबंधाला काळाच्या कसोटीवर सिद्ध करणारी ठरली आहे. गुरुजींच्या शहादतीमध्ये या समाजाने दाखवलेल्या अतुलनीय पराक्रमाचा उल्लेख शिखांच्या पवित्र श्री गुरु ग्रंथ साहेब जी ग्रंथात आहे. तथापि, गुरुमुखी या लिपीमध्ये असलेल्या या पवित्र ग्रंथात थेट बंजारा असा उल्लेख क्वचित आढळतो; मात्र सेवा, त्याग, समता आणि मानवता ही मूल्ये बंजारा समाजाच्या जीवनपद्धतीशी सुसंगत आहेत. शीख परंपरेतील सेवाभावात बंजारा समाजाचा आत्मा प्रतिबिंबित झालेला दिसतो. त्यामुळे शेकडो वर्षांपासून परस्परांच्या मान्यतेत व अस्तित्वात दोन्ही समाजाने एकमेकांचा आदर केला आहे. लखीशाह बंजारा यांचे बलिदान, बंजारा समाजाचे व्यापारी सामर्थ्य आणि शीख धर्माशी असलेले नाते हे सर्व भारतीय इतिहासातील सामाजिक ऐक्याचे उत्तम उदाहरण आहे. धर्म, जात किंवा व्यवसाय यापलीकडे जाऊन मानवतेसाठी उभे राहणे हीच या परंपरेची खरी देणगी आहे.

**– प्रवीण टाके उपसंचालक**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

# वस्ताद लहुजी साळवे क्रांतिकारकांचे गुरु



१७ फेब्रुवारी स्वातंत्र्यसंग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरु वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन आहे. भारत मातेला इंग्रजांच्या जोकडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्मे पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारत मातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षराने घ्यायला हवी होती मात्र त्यांच्या कार्याची दखल इतिहासकारांनी घेतली नाही म्हणून त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे.

वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला त्यांचे खापर पंजोबावर. शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावांच्या काळात शिकार खाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर लढवय्ये असल्याने लहुजी ने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली त्यामुळे लहुजी घोडेस्वार करणे. दांडपत्ता फिरवणे. भालाफेक करणे. बंदूक चालवणे. तोफ गोळा फेकणे. गनिमी कावा करणे. शत्रूची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलात पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले या युद्धात राघोजी सोबत तरुण लहुजीही सहभागी झाले या युद्धात राघोजी लहुजी या बाप लेकाने प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्वाला भडकली भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले त्या ठिकाणीच लहुजी ने १७ नोव्हेंबर १८९७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करताना मरेंन तर देशासाठी आणि जगेंन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यातील रस्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले.

इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले छत्रपती प्रताप सिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजा विरुद्ध चीड निर्माण झाली याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे. नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेस रंगे बापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांच्या विरुद्ध बंड पुकारले १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्र्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकून इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजी सह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले मामलेदारांच्या हत्तेला जबाबदार ठरून इंग्रजांनी कन्हैया मांग व धर्मामांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजींचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली या क्रांतिकारकाना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमेरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेशांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा .पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगम पुरच्या परिसरात एका झोपडी वजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली. आणि एका महान क्रांती पर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतुन मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्यासारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकारकांचे गुरु असे म्हणतात. आज त्यांचा स्मृती दिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितके जबाबदार आहेत. त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहोचले नाही. तरी आजच्या पिढीने वस्तादलहुजी साळवे यांचा आदर्श घ्यावा अशा या महान क्रांतिकारकांच्या स्मृती दिनानिमित्त क्राईम संध्याक परिवारातर्फे मानाचा मुजरा.

**– प्राचार्य शंकर सोनवणे, लातूर**

# भारतीय संस्कृतीचा गौरव : श्री गुरु तेगबहादुर साहिब

सत्याचा मार्ग आणि अहिंसेचे तत्त्व हे भारतीय विचारांचे एक अविभाज्य अंग आहे. हे तत्त्व केवळ शारीरिक हिंसा न करण्याइतपत मर्यादित नसून, अगदी मनातही कोणाबद्दल द्वेष बाळगू नये, असा त्याचा व्यापक अर्थ आहे. भारतीय संस्कृतीने जगाला विविधतेत एकता जोपासण्याचा मंत्रही दिला. एकम सत् विप्रा बहुधा वदंती' म्हणजेच सत्य एकच आहे, परंतु विद्वान लोक ते वेगवेगळ्या प्रकारे मांडतात, हे ऋग्वेदातील सूत्र भारतीय संस्कृतीतील धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा मूळ आधार मानले जाते. जिथे पाश्चात्य संस्कृती उपभोगावर भर देते, तिथे भारतीय संस्कृती त्याग आणि बलिदानाला महत्त्व देते. या मूळ विचारांचे स्मरण येथील जनसमुदायाला सातत्याने करून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी या भारतभूमीत जन्म घेतला. जगाला समता, सेवा आणि भक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या शीख समुदायाच्या तेजस्वी परंपरेत जन्मलेले गुरु तेगबहादुर साहिब हे अशाच महापुरुषांपैकी आहेत. गुरु तेगबहादुर यांचे बलिदान हा भारतीय मध्ययुगीन इतिहासातील समर्पणाच्या भावनेचा महत्त्वपूर्ण आणि शाश्वत अध्याय ठरतो. श्री गुरु नानकदेव असोत, श्री गुरु तेगबहादुर साहिब असोत की श्री गुरु गोविंद सिंह साहिब असोत, या साऱ्या महापुरुषांनी परकीय जुलूमशाहीच्या काळात भारतभूमीतील जनतेचे स्वत्व, आत्मसन्मान जागविण्याचे तसेच दिशाहीन समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे श्री गुरु तेगबहादुर साहीब यांचे स्मरण झाले की आजही त्यांचे विचार आणि मानवतेसाठी त्यांनी दिलेल्या बलीदानाचा इतिहास डोळ्यापुढे सरकतो. गुरु तेगबहादुर साहिब यांचा जन्म १६२१ मध्ये अमृतसर येथे शीखांचे सहावे गुरु श्री हरगोविंद साहिब यांच्या घरी झाला. गुरु हरगोविंद साहिब यांच्या पाच पुत्रांपैकी ते धाकटे होते. ते अध्यात्मिक रंगात रंगलेले, अंतर्मुख आणि मौनप्रिय होते. गुरुपदाच्या गादीची जबाबदारी स्वीकारल्यावर गुरु तेगबहादुर साहिब यांनी शीख समाजाला संघटित करण्याचे प्रयत्न सुरु केले. १६६५ च्या सुमारास त्यांनी आनंदपूर नावाचे स्थळ वसवले. पुढे ते आनंदपूर साहिब' म्हणून प्रचलित झाले. शीख धर्मातील अत्यंत पवित्र अशा स्थळांपैकी ते एक मानले जाते. गुरु तेगबहादुर साहिब यांनी तत्कालीन बंगाल, बिहार, आसामसह देशातील अनेक भागांना भेटी देऊन आपल्या विचारांचा प्रचार-प्रसार केला. १६६६ मध्ये पाटणा (पाटणा साहिब) येथेच त्यांच्या घरी गुरु गोविंदसिंह यांचा जन्म झाला. ते शीखांचे दहावे गुरु होत. गुरु तेगबहादुर साहिब हे केवळ धर्मगुरुच नव्हते, तर ते उत्तम साहित्यिक आणि रचनाकारही होते. त्यांनी आपल्या अनेक रचनांच्या माध्यमातून शीख तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार केला. सहज सोप्या भाषेसह त्यांचा भावप्रवाह अतिशय सशक्त आहे. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू प्रामुख्याने वैराग्य, नाम सिमरन' (देवाचे स्मरण) आणि जीवनातील नश्वरता हाच ठरतो. त्यांचे विवेचनाचे विषयही धार्मिक, तत्त्वमिमांसक आणि जीवनातील क्षणभंगुरता दर्शवणारे आहेत. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या रचनांना गुरु ग्रंथ साहिबमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या रचनांना सामान्यतः शबद' किंवा भजन म्हटले जाते. ज्यांत ईश्वर, मानवी संबंध, सेवा, मन-शरीर, मृत्यु, प्रतिष्ठा आणि मानवी स्थिती यांसारख्या विषयांचा व्यापक आवाका आढळून येतो.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

23 FEBRUARY TO 01 MARCH 2026 - Page 5 (CRIME SANDHYA) NEW:Layout 1 2/21/2026 9:00 PM Page 1



# देवणी येथे शिवजयंतीनिमित्त विविध देखाव्याने भव्य मिरवणूक



**देवणी : वार्ताहर**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६वी जयंती देवणी तालुका शिवजयंती समितीतर्फे मोठ्या उत्साहात व आनंदात साजरी करण्यात आली. यानिमित्त येथील विवेक वर्धीनी शैक्षणिक संकुलात सकाळी विविध धर्मीयांच्या राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेचे पूजन त्या त्या धर्मीयांच्या प्रमुखातर्फे करण्यात आले तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन येथील मठाधीश सिद्धलिंग महास्वामी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. जयंती समितीचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव पाटील तळेगावकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. तदनंतर छत्रपती शिवाजी महाराज व माँ जिजाऊ यांच्या प्रतिमेची आणि प्रति शिवाजी व जिजाऊ यांच्या रूपात अश्वावर बसून शहराच्या मुख्य रस्त्यावरून वाजत गाजत विविध प्रकारची देखावे सादर करत विविध वेशभूषा मध्ये मावळे यांच्यासह भव्य मिरवणूक काढण्यात आली चोका चौकात शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले मिरवणूक पाहण्यासाठी शहरातील असंख्य पुरुष व महिला यांनी प्रचंड गर्दी केली होती. मिरवणुकीचे चौका चौकात भव्य स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी विविध संघटना व मान्यवरा तर्फे खाऊचे व पाण्याचे वाटप करण्यात आले. येथील श्रीराम प्रतिष्ठान तर्फे या निमित्य भव्य रक्तदान चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ३३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शेवटी येथील विवेक वर्धीनी शैक्षणिक संकुलात या मिरवणुकीचा समारोप महाप्रसादाने करण्यात आला. या जयंती उत्सवात तालुक्यातील असंख्य शिवभक्तासह. तहसीलदार सोमनाथ वाडकर. सह्याक पोलीस निरीक्षक भीमराव गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक वराडे, व्यंकटराव पाटील, अण्णाराव पाटील, वैजनाथ अस्टूरे. बाबुराव इंगोले, सोमनाथ लुल्ले, संभाजी पाटील, शंकरराव पाटील, गोपीनाथ सगर, नागेश जीवने, बाळासाहेब पाटील, सदाशिव पाटील, तानाजी पाटील, किशोर निडवंचे, दिलीप मजगे, मनोहर पटणे, प्राध्यापक रेवण मळभगे, रोहित बंडगर, अटल धनुरे, पंडित पटवारी, वसंत कांबळे, इस्माईल तांबोळी, अनिल कांबळे, अभंग नीटुरे, श्रीरंग माने राज गुणाले देविदास पतंगे जावेद तांबोळी अशोक पाटील ओम धनुरे लखन जीवने सलीम उंटवाले रशीद मल्ले वाले एडवोकेट बसवराज ईश्वरशेते. प्राचार्य नंदकुमार पटवारी. डॉक्टर राम रतन शिंदे, महादेव मळभगे, माधव मांझिबाळे, वाघम्बर कांबळे, राजकुमार बिरादार, बसवराज पाटील, श्याम हरमुंजे, विनायक पाटील, दत्ता अचवलकर. मनोहर पाटील, कमलाकर बळीराम बिरादार पाटील अक्षय शिंदे. आणि तपसाळे. अजय शिंदे उमाकांत बर्गे यांच्यासह असंख्य शिवभक्त व शिवप्रेमी उपस्थित होते. जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी जयंती समितीचे पदाधिकारी व लोकजागृती शिक्षण संस्थेचे सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचलन अविनाश पाटील व शंकर बिरादार यांनी तर आभार सतीश पाटे यांनी मानले

# भिवंडीतील मराडे पाडा येथील शिवाजी महाराज मंदिरात शिवभक्तांची अलोट गर्दी



**भिवंडी : वार्ताहर**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्रातील पहिले भव्यदिव्य मंदिर भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरात महाराजांच्या ३९६व्या शिवजयंती निमित्ताने शिवक्रांती प्रतिष्ठानच्या वतीने विविध सांस्कृतिक आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मराडे पाडा येथील छत्रपतींच्या मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यानंतर मंदिरात प्रथमच साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती निमित्ताने संपूर्ण मंदिराची फुलांनी, रांगोळी ने सजावट करण्यात आली होती. सकाळी शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजूभाऊ चौधरी यांच्या शुभहस्ते सपत्नीक शिवरायांचा राज्याभिषेक, महाराजांची आरती, सामाजिक जाणिवेतून महारक्तदान शिबिर, पोवाडे गायन, शिवगीत, भजन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्या कडून लेझीम सादरीकरण, शिवगर्जना विद्यार्थ्या कडून सादर करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या दर्शनासाठी पहाटे पासूनच शिवभक्तांनी मराडे पाडा या ठिकाणी छत्रपतींच्या मंदिरात गर्दी केली होती अशी माहिती शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजूभाऊ चौधरी यांनी दिली आहे.

# वसईमध्ये शूटिंग सेट आगीच्या भक्ष्यस्थानी!



**वसई : वार्ताहर**

पालघर जिल्ह्यातील वसई येथील कमान परिसरात देवी स्टुडिओ (मालिकेचा शूटिंग सेट) येथे गुरुवारी दुपारी १:३० वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. आग लागताच संपूर्ण परिसरात घबराट पसरली आणि स्टुडिओमध्ये उपस्थित कलाकार आणि कर्मचाऱ्यांना तात्काळ बाहेर काढण्यात आले. प्रत्यक्षदर्शींच्या मते, स्टुडिओच्या एका भागातून अचानक धूर निघताना दिसला, त्यानंतर आगीने सेटचा मोठा भाग वेगाने व्यापला. माहिती मिळताच वसई विरार महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला सतर्क करण्यात आले. चार अग्निशमन गाड्या घटनास्थळी पोहोचल्या आणि आग विझवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले. अग्निशमन दलाने स्टुडिओमध्ये अडकलेल्यांना बाहेर काढले आणि खबरदारी म्हणून आजूबाजूचा परिसरही रिकामा केला. आग आटोक्यात आणण्यासाठी सतत पाण्याचा फवारणी सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, जरी स्टुडिओ सेट, उपकरणे आणि इतर साहित्याचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. आगीचे कारण सध्या अज्ञात आहे आणि तांत्रिक पथकाने तपास सुरू केला आहे. प्रशासनाने सांगितले की मदत आणि बचाव कार्य सुरू आहे आणि परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. आग पूर्णपणे आटोक्यात आल्यानंतरच नुकसानीचे खरे मूल्यांकन शक्य होईल. या घटनेनंतर स्थानिक रहिवासी चिंतेत आहेत आणि सुरक्षा व्यवस्थेबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान सहा दिवसांपूर्वी कामण परिसरात आयशा कंपाउंड परिसरात रंग तयार करणाऱ्या कारखान्यात भीषण आग लागली होती. या आगीत रंग तयार करण्याचे साहित्य व अन्य साहित्य जळल्यामुळे आगीची तीव्रता अधिकच वाढली होती. ही घटना ताजी असतानाच दुसरी घटना घडल्याने अग्निसुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## गुंज येथील वाळू माफियांची दादागिरी पुन्हा चव्हाट्यावर

# तहसीलदारासह पथकाला दगड हातात घेऊन वाळू वाहनांवर कारवाई रोखली

**परभणी : लक्ष्मण उजगरे**

पाथरी तालुक्यातील गुंज शिवारात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तहसीलदार एस.एन. हंदेश्वर यांच्या पथकावर वाळू माफियांनी दादागिरी केली. खडकी पुलाजवळ दगड हातात घेऊन धमक्या देणे, शिवीगाळ करणे आणि खाजगी गाडीचा पाठलाग करणे यापर्यंत मजल गेली. या प्रकरणी तलाठी सचिन साबळे यांच्या तक्रारीवरून पाथरी पोलिसांत प्रल्हाद गायकवाडसह १६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

सविस्तर बातमी पुढील प्रमाणे तहसीलदार यांना ट्रॅक्टरच्या सहाय्याने गोदावरी नदी पात्रातून अवैध वाळू उपसा करून साठा करण्यात येत असल्याची माहिती मिळाली. सदरील माहिती मिळाल्यानंतर तहसीलदार हंदेश्वर यांनी तात्काळ तलाठी सचिन साबळे आणि कोतवाल ब्रह्मराक्षे यांना फोन करून गुंजकडे जायचे आहे असे सांगितले. पहाटे ४ वाजता खाजगी डिझायर गाडीने (क्रमांक एम.एच.४६, झेड-२०३२) पाथरीहून गुंजकडे निघालेले हे पथक खडकी पुलाजवळ पोहोचले तेव्हा त्यांना टिप्पर आणि लोडर ट्रॅक्टरच्या साहाय्याने वाळूच्या ढिगाऱ्यावरून अवैध वाळू भरली जात असल्याचे दिसून आले. तलाठी साबळे यांनी लोडर ट्रॅक्टरची चावी काढून घेतली आणि चालकाला तहसील कार्यालयात ट्रॅक्टरसह हजर होण्याचे आदेश दिले. मात्र, चालक पळून गेला. काही वेळातच लोडर ट्रॅक्टरचा मालक चारचाकी वाहनाने घटनास्थळी हजर झाला. त्याने तहसीलदार आणि पथकाला, तुम्हाला काय, माझेच ट्रॅक्टर-टिप्पर दिसतात का? तालुक्यात एवढी रेती चालू आहे, माझी वाहने कशी नेता? असे म्हणत हुजत घालायला सुरुवात केली. याचवेळी पळून गेलेला चालक परत आला आणि मालकाने त्याला, चालकाला लाव रे, गावात फोन काट्यासहित माणसे बोलावून घे, असे सांगितले. थोड्याच वेळात गुंज गावाकडून आणखी एक ट्रॅक्टर रेती भरून आला आणि रेतीच्या ढिगाऱ्याजवळ थांबला. तहसीलदार आणि ब्रह्मराक्षे हे दुसऱ्या ट्रॅक्टरकडे गेले तेवढ्यात गुंज गावातून मोटरसायकलवर १० ते १२ इसम दाखल झाले. लोडर ट्रॅक्टरच्या मालकाने त्यांना सांगितले यांना मारा, असे म्हणत शिवीगाळ केली आणि तहसीलदारासह पथकाला मारण्याची चेतावणी दिली. वाद वाढल्याने तहसीलदार हंदेश्वर यांनी पथकाला गाडीत बसण्यास सांगितले आणि कायदेशीर कारवाई करण्याची गोष्ट करत निघाले. मात्र, वाळू माफिया यावर थांबले नाहीत, तर गाडीचा पाठलाग करत शिवीगाळ करत राहिले. या संपूर्ण प्रकरणाची माहिती तहसीलदार हंदेश्वर यांनी उपविभागीय अधिकारी संगीता चव्हाण आणि जिल्हाधिकारी संजय सिंह चौहान यांना फोनवर दिली. २० फेब्रुवारी रोजी तलाठी साबळे यांच्या फिर्यादीवरून पाथरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. यात प्रल्हाद गायकवाड (राहणार गुंज), ट्रॅक्टर-लोडर चालक (नाव-पत्ता माहीत नाही), टिप्पर चालक (नाव-पत्ता माहीत नाही), ट्रॅक्टर चालक (नाव पत्ता माहीत नाही) आणि इतर १०-१२ जणांचा समावेश आहे.

## पाथरी पोलिसात सोळा जनाविरुद्ध गुन्हा दाखल



गुन्ह्याचे कलम : धमकी देणे, अवैध वाळू उत्खनन व चोरटी वाहतूक, कामात अडथळा यासाठी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३२, ३०३(२), २९६, ३५२(२), १८९(२), १९० आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७)(८) लावण्यात आले आहेत. पाथरी पोलीस तपास करत आहेत. अशा प्रकरणांमुळे प्रशासन आणि माफियांमध्ये तणाव वाढत आहे, तर स्थानिक पर्यावरणालाही धोका निर्माण होत आहे. या घटनेमुळे पाथरी तालुक्यातील नागरिकांमध्ये रोष व्यक्त होत आहे. प्रशासनाने आता कठोर कारवाईची मागणी तीव्र झाली असून, वाळू माफियांवर धडक मारण्याची अपेक्षा आहे. पुढील घडामोडींवर नजर ठेवली जात आहे.

# बालयोगी श्री सदानंद महाराज आश्रम संस्थेच्या अयोध्या नगरीतील ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायणाचा शानदार शुभारंभ



**वसई : वार्ताहर**

बालयोगी श्री सदानंद महाराज आश्रम संस्थेच्या हिंदी ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास श्री बालयोगी सदानंद महाराज व संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी यांच्या हस्ते दीपप्रज्वत करून शानदार शुभारंभ झाला. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. कबीर महाराज, ह.भ.प. डॉ. दहिभाते, महाराज, ह.भ.प. रामचंद्र महाराज पेजोरे, ह.भ.प. विठ्ठल महाराज देसाई आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी आपल्या प्रास्ताविक भाषणात योगीराज महाराज गोसावी म्हणाले, पारायणाद्वारे नारायण प्राप्त होतो. भगवान कृष्णाने अर्जुनाला रणांगणावर भवसागर करून जाण्यासाठी जाण्यासाठी चे अध्यात्मिक ज्ञान सांगितले ते संभाषण संस्कृत भाषेत होते. संभाषणातील ते ज्ञान महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला अवगत व्हावे म्हणून संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी प्राकृत मराठी भाषेत ते ग्रंथीत करून उपलब्ध करून दिले. तेच ज्ञान समस्त हिंदी भाषिक भारत देशवासीयांना उपलब्ध व्हावे म्हणून बालयोगी श्री सदानंद महाराजांनी हिंदी भाषेत अनुवादित करून ग्रंथीत केलेले आहे. त्यांचे पारायण सोहळे आयोजित करून देशातील विविध धार्मिक स्थळांत दरवर्षी आपल्या हजारो भक्तमंडळांच्या मांदियाळीत अशा प्रकारचे पारायण सोहळे आयोजित करून पोहोचविले जाते. वर्तमानात अशाप्रकारे आपल्या हजारो अनुयायांना सोबत घेऊन अशा प्रकारे ज्ञान यज्ञ तेजो पवित करणारे, तीर्थाटन घडवून आणणारे ते देशांतील एकमेव संत असावेत. संत ज्ञानेश्वर महाराजांचे यावर्षी सप्तशतकत्तर सवर्ण महोत्सव जयंती वर्ष व त्यानिमित्ताने अवधनगरीत आयोजित केलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण विशेष पारायण सोहळ्याचे महत्व वेगळेच व अशा आयोजनाबद्दल त्यांनी अत्यंतिक आनंद व्यक्त करून या पारायण सोहळ्यात सामील झालेल्या हजारो बाल योगींच्या भक्तांना यावेळी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या पारायण सोहळ्यात ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी हे स्वतः दररोज तीन ते पाच भावार्थ रामायण कथा आचार्य श्री गोविंद देवजी गिरी महाराज हे दररोज सायंकाळी पाच ते सहा तीस, छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र तसेच सायंकाळी सात ते नऊ असे विविध नामांकित कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत दि. २४ फेब्रुवारी ११.३० ते १२ या वेळेत, अयोध्येतील संत महंतांचे स्वागत व पूजन व त्याच दिवशी रात्री नऊ वाजता इम्फळ मनिपुर येथील कलावंत वसंत रासलीला या सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणार आहेत. या सोहळ्यात अवैध नगरीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ह्या सोहळ्यातील ज्ञानामृत प्रासन करावे व सोहळ्याचा नयनरम्य आनंद लुटावा तसेच बालयोगींच्या दर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष गुरुनाथ भोईर यांनी केले आहे.

# काँग्रेस नेते राहुल गांधी भिवंडी न्यायालयात हजर; पुढील सुनावणी ४ एप्रिलला!

**भिवंडी : वार्ताहर**




आरएसएस संघटनेच्या मानहानी प्रकरणी भिवंडी न्यायालयात दाखल याचिकेच्या सुनावणी साठी लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी शनिवारी भिवंडी न्यायालयात हजर झाले. या प्रकरणात राहुल गांधी यांनी यापूर्वी दिलेले जामीनदार माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन झाल्याने न्यायालयात दुसरा जामीन देण्यासाठी ते भिवंडी न्यायालयात हजर झाले होते. भिवंडी न्यायालयातील न्यायाधीश पी एम कोळसे यांच्या न्यायालयात राहुल गांधी उपस्थित झाले होते. यावेळी खटला दाखल करणारे आरएसएसचे राजेश कुंटे देखील न्यायालयात उपस्थित होते. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांचा जामीन राहुल गांधी यांनी दिला असून पुढील सुनावणी ४ एप्रिल रोजी होणार असल्याची माहिती ॲड.नारायण अय्यर यांनी दिली. राहुल गांधी भिवंडी न्यायालयात येणार असल्याने काँग्रेसचे पदाधिकारी व नवनिर्वाचित नगरसेवक राहुल गांधी यांना भेटण्यासाठी न्यायालयात व परिसरात हजर होते मात्र राहुल गांधी कुणालाही न भेटता राहुल गांधी भिवंडी न्यायालयातून निघून गेले. राहुल गांधी यांच्या प्रकरणाची सुनावणी शनिवारी पावणे अकरा वाजता होती. मात्र ते १५ मिनिटे आधीच न्यायालयात हजर झाले होते. राहुल गांधी नेहमीच न्यायालयाचा आदर करतात, त्यामुळे ते पंधरा मिनिटे आधीच न्यायालयात हजर झाले होते. जामिनीच्या बॉण्डवर सह्या व इतर न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून ते निघून गेले अशी माहिती ॲड.नारायण अय्यर यांनी दिली. राहुल गांधी भिवंडीत येणार असल्याने शनिवारी भिवंडीत चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. भारतीय कायद्याप्रमाणे जामीन घेणे आवश्यक होते. त्यानुसार राहुल गांधी यांना पुन्हा न्यायालयात सुनावणीसाठी याव लागल. न्यायव्यवस्थेपेक्षा दुसर काही मोठ नाही, हे न्यायालयाने आज सिद्ध केल आहे अशी प्रतिक्रिया याचिकाकर्ते राजेश कुंटे यांनी दिली आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुक काळात भिवंडी तालुक्यातील सोनाळे येथे आयोजित प्रचार सभेत राहुल गांधी यांनी महात्मा गांधी हत्येमागे आरएसएस या संघटनेचा हात असल्याचे विधान केले होते. त्याविरोधात आरएसएस संघटनेचे पदाधिकारी राजेश कुंटे यांनी भिवंडी न्यायालयात आर एस एस संघटनेची बदनामी झाल्याबद्दल खाजगी फिर्याद दाखल केली आहे. मुलुंड टोल नाका परिसरात राहुल गांधी यांना भाजप कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवले हे अत्यंत निंदनीय आहे. राहुल गांधी यांच्या जीवाला धोका असल्याचे सर्वांना माहीत आहे. अशा परिस्थितीत त्यांना काळे झेंडे दाखवणे चुकीचे आहे. याठिकाणी काहीही विपरीत घटना घडण्याची शक्यता नाकारता येणार नव्हती. त्यामुळे सरकारचा व पोलीस प्रशासनाचा आम्ही निषेध करतो अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे नगरसेवक प्रशांत लाड यांनी दिली. त्यांच्या सोबत उपमहापौर तारिक मोमीन यांनी देखील या घटनेचा निषेध केला.

## अनियंत्रित ट्रकची अनेक वाहनांना धडक

कल्याण : टिटवाळा पूर्वेकडील असलेल्या मुख्य गणेश मंदिर रोडवर बुधवारी सकाळी ११ च्या दरम्यान भीषण अपघाताची घटना घडली. एका मोठ्या मालवाहू ट्रकने नियंत्रण सुटल्याने रस्त्यावर उभ्या असलेल्या आणि जाणाऱ्या अनेक वाहनांना जोरदार धडक दिली. बेदरकार वेगात आलेल्या या ट्रकने काही दुचाकी, चारचाकी आणि इतर वाहनांना उडवत थेट गणेश मंदिर रोडवरील पटेल मार्ट परिसरात येऊन थांबला. वाहनावरील नियंत्रण सुटले. चालकाने काही सेकंदांतच समोर येणाऱ्या तसेच पार्क केलेल्या अनेक वाहनांना धडक देत मोठ्या प्रमाणात नुकसान केले. तर हा ट्रक इथेच न थांबता पुढे गणेश मंदिराच्या दिशेने पुन्हा वेगाने जात पटेल मार्टच्या जवळ एका दुभाजकाला येऊन आदळला आणि थांबला.

# नालासोपारा रेल्वे स्थानकात मोबाईल चोरांचा उच्छाद

**नालासोपारा : वार्ताहर**

नालासोपारा रेल्वे स्थानकात आठवड्याभरात तब्बल तीन मोबाईल चोरीच्या उघडकीस आल्या आहेत. मोबाईल चोरी प्रकरणी रेल्वे सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. नालासोपारा रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या वाढत्या गर्दीसह मोबाईल चोरीच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. गेल्या आठवड्याभरात नालासोपारा रेल्वे स्थानकात तब्बल तीन मोबाईल चोरीच्या घटना उघडकीस आल्या आहेत. यातली पहिली घटना शुक्रवार, ३० जानेवारी रोजी घडली. नालासोपारा रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक २ वरून ७ हजार किंमतीचा मोबाईल चोरीस गेला होता. तर दुसऱ्या दोन घटनांमध्ये नालासोपारा रेल्वे स्थानकातून ५२ हजार १६० रुपये किंमतीचा मोबाईल आणि महिलेचे पाकीट तसेच ९ हजार किंमतीचा मोबाईल चोरीला गेला होता. याप्रकरणी वसई लोहमार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. तर रेल्वे सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांकडून याप्रकरणी तपास सुरू करण्यात आला होता. रेल्वे स्थानकावर पाळत ठेऊन तसेच सीसीटीव्ही कॅमेरे तपासून अधिकाऱ्यांनी ऋषभ गुप्ता (३०), लखेंद्र दास (१९) आणि आकाश भौमिक (२९) या तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले असून पुढील कारवाईसाठी वसई रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

## तीन आरोपींना घेतले ताब्यात



पान १ वरून....

## काकाला देत नव्हता जराही ...

मुलगी यांच्या डोक्यावरील आइ वडीलांचे छत्र हरपल्यामुळे गोपाल हा आजी आजोबांकडे हातणी येथे राहू लागला, तर त्याची बहीण चिखली येथे आत्याकडे रहात होती. रामचंद्र जाधव यांचा लहान मुलगा विनोद हा गावात वेगळा रहात होता, मात्र त्याचे घरकुल बांधकाम सुरू असल्याने तो सात-आठमहिन्यांपासून आई-वडीलांकडे त्यांच्या घरात रहात होता. विनोद दारू पिऊन नेहमीच पत्नीसोबत वाद-विवाद करत असे. तसेच तो गावात भांडखोर म्हणून प्रसिद्ध होता. नेहमीच घरी आल्यावर पत्नीसोबत वाद होत असल्याने त्याचे आई-वडील आणि पुतण्या गोपाल कंटाळले होते, म्हणून ते नेहमी विनोदला वाद करू नको म्हणून समजावत होते. विनोदच्या स्वभावात मात्र फरक पडत नव्हता. बुधवार दि. २१ जानेवारी २०२६ रोजी नेहमीप्रमाणे सायंकाळी साडेसात वाजण्याच्या दरम्यान विनोद दारू पिऊन घरी आला आणि पत्नीला शिवीगाळ करून मारझोड करू लागला, तेंव्हा त्याचे वडील रामचंद्र नुकतेच जेवायला बसले होते. मात्र मुलाचा आणि सूनेचा वाद होत असल्याने ते जेवणाचे ताट सोडून मुलगा आणि सूनेचे भांडण सोडवायला धावले असता तुम्ही आमच्या भांडणात पडू नका असे सूनेने त्यांना सुनावले. आता सून भांडणात पडू नका म्हणत असल्याने ते बाजूला झाले. नेहमीची कटकट असल्याने गोपालने काकाला, 'तुम्ही इथे वाद करू नका तुमच्या वादामुळे विनाकारण गावात बदनामी होत आहे, वाद करायचा असेल तर या घरात राहू नका, अशी तंबीच दिली. पुतण्या आपल्याला धमकावतो याचा विनोदला राग आल्याने तो चवताळला. आता चुलता व पुतण्याचे भांडण जुंपले. घरात भांडण झाल्याने रामचंद्र जाधव यांनी आपले चिखली येथील जावयास सांगितल्यामुळे रात्रीच त्यांचे जावई हातणी येथे आले. त्यांनी विनोदसह सर्वांना समजावून सांगून भांडण सोडवले.त्यानंतर ते सासरे रामचंद्र यांना घेऊन चिखली येथे आपल्या घरी निघून गेले. घरातील भांडण काही काळासाठी थांबले होते. मात्र गोपालच्या बोलण्याचा विनोदच्या मनावर खूप परिणाम झाला. आपला पुतण्या आपल्याला धमकावतो हेच त्याला सलत होते. त्याच्या मनात गोपालबद्दल राग खदखदू लागला होता. तो रागाने चरफडत होता. दरम्यान घरातील सर्व सदस्य जेवण करून झोपी गेले. गोपालही आपल्या खोलीत झोपण्यासाठी निघून गेला. खुनशी विनोदच्या मनात मात्र राग खदखदत होता. रात्री दहा वाजण्याची वेळ असावी, गोपाल आपल्या खोलीत पलंगावर झोपी गेला होता. विनोदने घरातील एक धारदार कुऱ्हाड घेतली आणि तो दबक्या पावलांनी गोपालच्या खोलीत गेला, तेंव्हा गोपाल गाढ झोपेत होता. हे पहाताच विनोदने गोपालच्या डोक्यावर कुऱ्हाडीच्या मागच्या भागाने जोरदार प्रहार केला. गाढ झोपेतील गोपाल किंकाळी ठोकत रक्ताच्या थारोळ्यात कायमचा निद्रिस्त झाला. रक्ताच्या धारा वहात होत्या. त्याच्या किंकाळीने घरातील लोकांना जाग आली. ते धावतच गोपालच्या खोलीकडे धावले. समोरचे दृष्य पाहून घरच्यांनी आक्रोश सुरू केला. कोणीतरी या घटनेची माहिती चिखली पोलीस स्टेशनला दिली. चिखलीपासून पाच किलोमीटरवर असलेल्या हातणी गावात एकाने पुतण्याचा खून केल्याची खबरड्युटी ऑफिसर पोलीस उपनिरीक्षक नितीन चौहान यांना मिळाली. त्यांनी घटना त्वरित ठाणेदार गावंडे यांच्या कानावर घातली. घटनेचे गांभीर्य पहाता ठाणेदार गावंडे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळ गाठले. हातणी गावातील रामचंद्र जाधव यांच्या घरासमोर गावकऱ्यांनी तोबा गर्दी केली होती. फॉरेन्सिक टीमने घटनास्थळ सील करून काही नमुने गोळा करण्यास सुरूवात केली. जाधव यांच्या घरातील एका खोलीत गोपाल जाधव (वय २४) हा तरूण पलंगावर मृतावस्थेत पडला होता. त्याचा चेहरा रक्ताने माखला होता, तर डोक्यातून अजूनही रक्त ओघळत होते. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा व इतर सर्व कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून गोपालचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी चिखली येथे पाठवला. गोपालला निघृणपणे संपणारा त्याचा काका विनोद जाधव मात्र फरार होण्यात यशस्वी झाला होता.चिखली पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाने संशयिताचा हातणी परिसरात रात्रीच्या अंधारात शोध घेण्यास सुरूवात केली. सर्व परिसर पिंजून काढल्यावर बॅटरीचा उजेडात एका शेतात नुकतीच पाऊले उमटल्याचे पोलिसांना दिसले. त्या दिशेने सावध पाऊले टाकली असता संशयित आडोशाला लपून बसल्याचे लक्षात येताच पोलिसांनी झडप घेऊन त्याला ताब्यात घेतले. मृतक गोपालचे आजोबा रामचंद्र मारूती जाधव यांच्या फिर्यादीवरून चिखली पोलिसांनी अप. क्रमांक ६०/२६ कलम१०३(१), ३५२ भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये आरोपी विनोद जाधव याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान शवविच्छेदन झाल्यावर मृतक गोपाल याच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. घरात नेहमी वाद करणाऱ्या काकांना घरात वाद - विवाद करण्यास मज्जाव करणाऱ्या पुतण्याचा क्रूर काकाने कुऱ्हाडीने निघृण खून केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात स्पष्ट होत आहे.या घटनेचा तपास बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधिर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोलीस निरीक्षक भूषण गावंडे, पोलीस उपनिरीक्षक शरद भागवतकर, नितीन चव्हाण, पोलीस हेडकॉन्स्टेबल विजय किटे, बीट अंमलदार पोलीस नाईक अनिल वाघ, पोलीस कॉन्स्टेबल सुनिल राजपूत, अमोल इंगळे, ज्ञानेश्वर शिंदे, तसेच डी.बी. प्रथकाचे पोलीस नाईक अमोल गवई, पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश धनदर, अजय इटावा, राहुल पायघन यांनी केला.

## कबुदरावरून मैत्रीचा धागा...

एका १७ वर्षीय तरूणाचा खून झाल्याची घटना घडली. साक्री शहरातील राणाप्रताप चौकातील मुस्लिम वस्तीमध्ये भटू पिंजारी, सईद शेख, सलमान शेख रहातात. भटू पिंजारी याचा मुलगा नूर आणि सईद शेख याचा मुलगा शोएब हे दोघे जिगरी दोस्त. शाळेला, खेळायला, फिरायला ते नेहमी एकत्र जातात. या दोघांना कबुतर पाळण्याचा शौक आहे. दोघांनी आपआपल्या घराच्या छतावर कबुतरांसाठी स्वतंत्र खुराडे तयार केले होते. सकाळ-संध्याकाळ दोघे जण आपापल्या कबुतरांना दाणा-पाणी करत. कबुतर पकडण्याची एक प्रक्रिया आहे. त्यामध्ये आपल्या पाळलेल्या कबुतरांना दाणा-पाणी करतांना एखादे नवखे कबुतर आकाशात उडत असले, तर ते दाणा-पाण्याच्या निमित्ताने खाली उतरते, तेंव्हा त्याला पकडून त्याचे पंख छाटले जातात. नवीन पंख येण्यासाठी किमान दोन महिने लागतात, त्यामुळे ते उडू शकत नाही आणि तेथे असणाऱ्या कबुतरांमध्ये मिसळून ते तिथलेच होवून जाते. एखाद्याचे ते कबुतर असले तर ते मूळ मालकाकडेही जात नाही. शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी शोएब आणि नूर दोघे आपआपल्या कबुतरांना दाणा-पाणी करत असतांना नूर भटू पिंजारी याचे आकाशात घिरट्या घालणारे कबुतर शोएब सईद शेख याच्या कबुतरांत मिसळून दाणे खाबू लागले, तेंव्हा शोएबने त्यास पकडले. हे नूर पिंजारी याने पाहिले. दुपारचे तीन वाजण्याची ही घटना. शोएब आपले कबुतर सोडतो की स्वतःजवळ ठेवून घेतो हे नूर पहात होता, पण शोएबने पकडलेल्या त्या कबुतराचे पंख छाटले आणि आपल्या खुराड्यात ठेवले. हे पाहिल्यावर नुरने ते कबुतर शोएबकडे मागितले. त्यावेळी शोएब म्हणाला, 'तुला नियम काही माहित नाही का? तुझे कबुतर माझ्या कबुतरात येवून दाणे खात असतांना मी ते पकडले, त्यामुळे ते माझे झाले. मी तुला कसे परत करणार?' यावरून दोघांमध्ये वादावादी झाली. शोएब मात्र ते कबुतर देण्यास तयार नव्हता, हे लक्षात आल्यावर नूर म्हणाला, 'महँगा पडेगा तुझे.' त्यावर शोएब म्हणाला, 'तू जो चाहता वो कर!' त्याच्या या वागण्याचा नूरला राग आला. काही वेळाने शोएब घडलेली घटना विसरून खेळायला गेला. नूरच्या मनात मात्र शोएबबद्दल बदल्याची भावना जागृत झाली. तो त्या कारणाने अस्वस्थ होता. शोएबचा बदला घेण्यासाठी तो आराखडा बांधत होता. इकडे परिसरातील मुलांना नूरने घडलेली घटना सांगितली होती. शोएबशी झालेला वाद त्याने सांगितल्याने मोहल्ल्यात चर्चा झाली होती. त्याचदिवशी म्हणजे शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास नूरने शोएबला काही कारण सांगून त्याच्या छतावर बोलावले. गप्पा-गोष्टी करण्यासाठी ते नेहमी एकमेकांना फोन करून बोलावत असत. नूरचा फोन येताच शोएब आपल्या घरच्यांना सांगून नूरच्या घराच्या छतावर गेला. रात्रीचे साडेदहा वाजण्याच्या दरम्यान नूरच्या छतावर आपट-धोपटचा मोठा आवाज आला. त्यावेळी शांतता असल्याने परिसरातील नागरिक त्या आवाजाने घराबाहेर आले व आवाजाच्या दिशेने पाहू लागले. शोएबचे कुटुंबीयसुद्धा घराबाहेर येवून नूरच्या घराच्या दिशेने आलेल्या आवाजाचा वेध घेवू लागले. दरम्यान नूरची आई नर्गिस भटू पिंजारी ही घाई करत छताच्या जिन्यातून खाली उतरतांना शोएबचा काका सलमान शेख याला दिसली. नर्गिसने जिन्यावरून खाली येताच जिन्याचा दरवाजा लावून कडी घातली. दरम्यान नूरच्या घराचा छतावरील लाईट बंद झाला. छताच्या जिन्यावरून घाई-घाईने खाली उतरणाऱ्या नर्गिसला पाहून सलमान शेख आणि आसिफ शेख यांनी नर्गिसला विचारले, 'काय झाले?' तेंव्हा नर्गिसने सांगितले, 'आमच्या छतावर कबुतर चोरण्यासाठी चार आदिवासी तरूण आले होते. आम्हाला पाहून ते आदिवासी तरूण मागच्या बाजूला उड्या मारून पळाले. घराच्या छतावरून उड्या मारणे धोक्याचे असल्याने त्या तरूणांना नक्कीच दुखापत झाली असणार म्हणून शोएबचा काका घरासमोर उभ्या असलेल्या जमावाने आणि सलमान शेखने पाहिलें. नूरला घेवून नर्गिस तात्काळ घरासमोर उभ्या असलेल्या जमावाने आणि सलमान शेखने पाहिलें. नूरला घेवून नर्गिस तात्काळ आपल्या घरात घुसली. नेमकं काय झालं? अशी चर्चा सुरू असतांना नूर शेखचा बाप भटू पिंजारी हा घरातून बाहेर आला. त्याला लोकांनी विचारले असता त्यानेही नर्गिसने जे सांगितले तेच सांगितले आणि पुढे त्यांना म्हणाला, या चार आदिवासी तरूणांना शोएब आणि नूरने रोखले त्याचा राग येवून आदिवासी तरूणांनी शोएब आणि नूर या दोघांना बेदम मारहाण केली. मी, नूर आणि नूरची आई नर्गिस आम्ही तिघे साक्री तालुका पोलीस स्टेशनला जात आहोत असे भटू पिंजारीने सांगितले, पण भटू पिंजारी काही तरी खोटं बोलतो हे सलमान शेख आणि आसिफ शेख यांना समजून आले म्हणून त्या दोघांनी भटू पिंजारीच्या घरावरील छतावर धाव घेतली. छतावर स्मशान शांतता आणि अंधार होता. सलमान शेख आणि आसिफ शेख या दोघांनी आपल्या मोबाईलमधील टॉर्चच्या प्रकाशात पाहिले तेंव्हा शोएब शेख हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला त्यांना दिसला.सलमान शेखने तात्काळ साक्री तालुका पोलीस स्टेशनशी संपर्क साधून घडलेली घटना सांगितली. माहिती मिळताच साक्री तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपक वळवी हे आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी आले. त्यांनी घटनेचा आणि मृतदेहाचा पंचनामा करून शोएब शेखचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी शासकीय रूग्णालयात पाठवला. शोएब शेख याचा काका सलमान शेख आणि आत्या नसरीन यांच्या सांगण्यानुसार शोएब शेख हा आपल्या आई-वडीलांना पारखा झाल्याने तो आपल्या आजी-आजोबांकडे रहात होता. शोएब मृत पावल्याने शोएबचे आजी-आजोबा निराधार झाले. पोलीस निरीक्षक दिपक वळवी यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई चालू करण्यात आली. भटू पिंजारीचे अनेक अवैध धंदे असल्याने त्याचे पोलीस यंत्रणेशी निकटचे संबंध आहेत, त्यामुळे तो पोलीस कस्टडीत असतांना त्याला मोबाईल वापरण्याची संमती देण्यात आली आहे, त्याने मुलाचा गुन्हा लपवण्यासाठी खोटा बेबनाव करून पोलिसांची दिशाभूल करण्याचा आणि हिंदू-मुस्लिम वाद निर्माण करून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्नही केल्याचे शोएबची आत्या नसरीन, शोएबचा काका सलमान शेख यांनी पोलिसांना सांगितले. या प्रकरणाने साक्री शहरातील शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी स्वतः साक्रीला भेट दिली. त्यावेळी संतप्त जमावाने भटू दिलावर पिंजारी हा गुंड प्रवृत्तीचा असून त्याच्यावर अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. त्याला शहरातून हद्दपार करा. संपर्क मंत्री जयकुमार रावळ आणि सामाजिक कार्यकर्ते नबूपिंजारी यांना नाहक बदनाम केले जात असल्याचे निवेदन शफियोद्दीन शेख, शरफोद्दीन शेख, मोसी मोहेम शेख, अक्रम चिरागोद्दीन, रेहमान रफिक, अहमद तांबोळी रिजवान शाह, कुणाल वाघ, लहु वानखेडे, सुनिल लोणारी आदींनी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना दिले. कुठल्याही प्रकारचा आडपडदा न ठेवता कुणालाही अवैध संरक्षण न देता वस्तुस्थितीवर तपास करून गुन्हेगारांना कडक शासन करण्याची कारवाई पोलीस यंत्रणा करेल असे स्पष्ट आश्वासन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिले. सलमान शेख यांच्या फिर्यादीवरून साक्री तालुका पोलीस स्टेशनमध्ये नूर भटू पिंजारी, भटू दिलावर पिंजारी आणि नर्गिस भटू पिंजारी यांच्याविरोधात खुनाचा आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा रजि. नं. २९/२०२६ नुसार गुन्हा दाखल केला आणि संशयितांना गजाआड करण्यात आले.

## मांडवलीसाठी जमले पण राडा...

फायदा घेत याच रस्त्यालगत छोट्या-मोठ्या पाणीपुरी, पावभाजी, वडापाव, आईस्क्रीम, दाबेली, निलंगा राईस अशा व्यवसायिकांनी आपला अनाधिकृत व्यवसाय थाटला आहे. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी संध्याकाळी सहा ते सात वाजण्याच्या सुमारास लोकांनी या परिसरात एकच गर्दी केली होती. दोन टोळक्यात हाणामारी होऊन चाकू सारख्या धारदार शस्त्राने एकमेकावर वार केल्याची चर्चा लातूर शहरात वाऱ्यासारखी पसरली. या हाणामारीत एकाला गंभीर दुखापत झाली असून त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची माहिती लोकांमधून बोलली जात होती. पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनाच्या गेट समोर रक्ताचा सडा पडला होता. या घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिषेक यांनी ठाण्यातील कर्मचाऱ्यांसोबत पुराणमला लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन भागाकडे धाव घेतली. पोलिसांना पाहताच जमावाने काढता पाय घेतला. पोलिसांनी घटनास्थळाचा ताबा घेऊन घटनेची अधिक माहिती जाणून घेतली. पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन मध्ये शिक्षण घेणाऱ्या दोन गटांमध्ये ही हाणामारी झाली असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली. एका गटाने दुसऱ्या गटातील चौघांवर चाकू हल्ला केल्याची माहिती समोर आली. तसेच या हल्ल्यात एक जण गंभीर जखमी झाला असून त्याला त्याच्या मित्रांनी पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असल्याचे पोलिसांना कळाले. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी पुढील तपास कामी शासकीय रुग्णालय गाठले. तेव्हा तेथे या हल्ल्यात गंभीर जखमी झालेला विक्रम नारायण पांचाळ (२१) हा तरुण उपचारा आधीच मृत्यूमुखी पडला असल्याची माहिती डॉक्टरनीं दिली. दरम्यान घटनास्थळाला लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांनी भेट देऊन घटनेची प्राथमिक माहिती जाणून घेतली. तसेच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांना पंचनाम्याचे आदेश दिले. पोलिसांनी घटनास्थळावरील आवश्यक की माहिती घेऊन पुढील तपासाला सुरुवात केली. मयताचा मित्र आदित्य भरत सगरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण ,लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्र शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्या हाती घेण्यात आले. शिवाजीनगर पोलीस ठाण्याची पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी या प्रकरणातील तक्रारदाराने दिलेल्या माहितीवरून तपासाची दिशा ठरवली. पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी पोलीस ठाण्यातील डीबी पथकाला योग्य त्या सूचना करून विक्रम पांचाळ खून प्रकरणातील संशयित आरोपीच्या मार्गावर पाठवले. सर्वप्रथम शिवाजीनगर पोलिस पथकातील पोलिसांनी पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तसेच आधुनिक माहिती आणि तंत्रज्ञानाचा आधार घेत तपासला गती दिली. दरम्यान एका गुप्त खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीवरून शिवाजी नगर पोलिसांनी तपासाचे चक्र गतिमान करून लातूर शहरापासून काही अंतरावर लपून बसलेले व पळून जाण्याचा बेताब आसलेले संशयीत आरोपी केदार महादेव क्षिरसागर (वय १९ वर्षे) व श्रीधर तानाजी जाधव (वय २४ वर्षे ,दोघे रा. शिवली, ता. औसा) या दोघांना ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी अणखी दोघा साथीदारांची नावे सांगितली. यावरून पोलिसांनी लातूर शहरातील वेगवेगळ्या ठिकाणावर या प्रकरणातील अन्य संशयीत आरोपी प्रणव अप्पाराव उदगीरे (वय २० वर्षे रा. नळेगाव, ता. चाकूर) व सुजल जेजेराव दिंडे (वय १९ वर्षे रा. दिंडेवाडी, ता. कंधार, जि. नांदेड) यांना ताब्यात घेवून शिवाजी नगर पोलिस ठाण्यात हजर केले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सुरवातीला असमाधानकारक उत्तरे दिली. पोलिसांनी त्यांना विश्वासात घेवून आधिक माहीती घेतली असता त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबूली देवून सांगण्यास सुरूवात केली. केदार क्षिरसागर, श्रीधर जाधव हे दोघे लाहानपणापासून नातेवाईक व मित्र होते. गेल्या दोन वर्षापुर्वी केदार क्षिरसागर हा लातूर येथील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन येथे डिप्लोमा करण्यासाठी आला होता. तो तंत्रनिकेतनच्या शासकीय वस्तीगृहात राहत होता. तर श्रीधर जाधव पुणे येथे कामानिमित्त गेला होता. दरम्यान २०२५ मध्ये श्रीधर जाधव यांच्यावर भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याला जेलची हवा खावी लागली होती. मात्र कालंतराने त्याची सुटकापण झाली होती. काही दिवसापुर्वी केदार क्षिरसागर याचे लातूर पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन येथे इतर फॅक्लटी मध्ये शिक्षण घेणारे अदित्य सगरे, विक्रम पांचाळ व वस्तीगृहातील इतर मुलांसोबत दुचाकीचे (ज्युपिटर) मिटर फोडल्यावरून वाद झाला होता. केदार क्षिरसागर यांनीच काच फोडल्याचा संशय व्यक्त करण्यात येत होता. दुचाकीचा काच फोडल्याच्या घटनेला देखील केदार क्षिरसागर यांने दुजोरा दिला होता. दरम्यान १६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारच्या सुमारास दुचाकी (ज्युपिटर) नुकसानप्रकरणी चांगलाच वाद निर्माण झाला होता. दरम्यान केदार क्षिरसागर यांने वाद मिटविण्यासाठी आपला मित्र श्रीधर जाधव याला बोलावून घेतले होते. दुपारी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून सायंकाळी वस्तीगृहाच्या गेटसमोरील रस्त्यावर केदार क्षिरसागर, श्रीधर जाधव, प्रणव उदगीरे व सुजल दिंड पुन्हा एकत्र आले. त्याच वेळी अदित्य सगरे, विक्रम पांचाळ व त्याचे अन्य दोन मित्र गेटजवळ थांबले होते. बेसावध आसलेल्या विक्रम पांचाळ व अदित्य सगरे यांच्यावर श्रीधर जाधव यांने आपल्या जवळ आणलेल्या चाकूने सपासप वार केले. तसेच सोडविण्यासाठी गेलेल्या अदित्य सगरे व त्याच्या मित्रावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात विक्रम नारायण पांचाळ याच्या छातीत पोटात चाकूचे गंभीर वार लागल्यांने तो जमीनीवर कोसळला. पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन गेटजवळ रक्ताचा सडा पडला. तात्काळ उपचारासाठी हलविण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. वरील आरोपींना मा. न्यायालयासमोर हजर केले असता पोलीस कोठडी (पी.सी.आर.) मंजूर करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक अभिषेत शिंदे करीत आहेत.

## दागिन्यांसाठी रक्ताचे नाते कुचकामी ...

केले असून, त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. उषा भिऊंगडे यांचे पती मारुती भिऊंगडे यांचे ३० डिसेंबर २०२५ रोजी निधन झाले होते. मूलबाळ नसल्याने त्या गंगावेश येथील शुक्रतारा अपार्टमेंटच्या फ्लॅटमध्ये एकट्याच राहत होत्या. काही दिवसांपासून आजारी असलेल्या उषा यांची देखभाल फुलेवाडी येथील पुतण्या परशुराम भिऊंगडे हे करत होते. रविवारी (१५ फेब्रुवारी) रात्री परशुराम हे औषधे देऊन गेले. सोमवारी सकाळी शाहूवाडी तालुक्यात कामानिमित्त गेल्यावर सकाळी १० वाजताच्या सुमारास उषा यांना त्यांनी फोन केला, पण प्रतिसाद मिळाला नाही. चिंतेतून शेजाऱ्यांना फोन करून घराची चौकशी करण्यास सांगितले. शेजाऱ्यांनी फ्लॅटमध्ये जाऊन बेडरूममध्ये उषा निपचित पडलेल्या आढळल्या. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू ठेवला. तांत्रिक माहिती, सीसीटीव्ही फुटेज, शेजारी आणि नातेवाईकांकडून माहिती गोळा केली. त्यातच मृत्यूच्या सकाळी प्रेम पावणेनऊ वाजताच्या सुमारास फ्लॅटमध्ये अर्धा तास थांबून गेल्याची खबर मिळाली. मोबाइल बंद ठेवून तो अनुपस्थित असल्याने पोलिसांचा संशय बळावला. त्यानंतर प्रेमला ज्ञानसागर रेसिडेन्सी, फुलेवाडी रिंगरोड येथून ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली, पण कसून चौकशीत खुनाची कबुली दिली. महाविद्यालयीन शिक्षणापासून चैनीचे व्यसन लागलेल्या प्रेमला पैशांची गरज होती. वडील परशुराम सोनारकाम करतात. प्रेमने सोन्यात वापरल्या जाणाऱ्या विषारी पावडरचा वापर केला होता. त्याने सोमवारी सकाळी उषा यांच्या फ्लॅटवर जाऊन चहा बनवला, त्यात ती पावडर मिसळली आणि आजीला दिला. नातवावर विश्वास ठेवून आजी तो चहा प्यायल्या. चहा पिताच त्यांना दरदरून घाम आला, शरीर थंड पडले आणि त्या बेशुद्ध झाल्या. आजी मृत झाल्याची खात्री होताच प्रेमने सहा पाटल्या, दोन सोनसाखळ्या, कर्णफुलेसह दहा तोळे दागिने चोरले. खून करून प्रेम दुचाकीवरून शिवाजी विद्यापीठात गेला, तिथे मित्रांना भेटला. ११ वाजता परशुराम यांनी फोन करून मृत्यूची बातमी सांगितली. त्यानंतर प्रेम दुपारी फ्लॅटवर आला, अर्धा तास थांबून पोलिसांच्या भीतीने हळूच त्यानं तिथून पळ काढला. फोन स्विच ऑफ करून कपडे बॅगेत भरले, कोकणात मित्रांसोबत जाणार असे सांगून बाहेर पडला. मात्र १९ फेब्रुवारीला घरी परतल्यावर त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिस निरीक्षक सुशांत चव्हाण, सहायक निरीक्षक सागर वाघ, रूपेश माने, अमित सर्जे, अरविंद पाटील, हंबीरराव अत्रे, राजेश राठोड, सागर चौगले यांच्या तपास पथकाने हा खुनाचा छडा लावला आहे.

पान ८ वरून....

## वसई विरार महापालिकेच्या महासभेत...

करण्यात आली आहे. वसई विरार महापालिकेची स्थापना २००९ साली होती. त्यानंतर २०१० मध्ये महापालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक पार पडली.त्यावेळी ८९ जागांपैकी ६४ जागेवर बविआने जिंकून आपला महापौर बसविला होता.असे जरी असले तरी जनआंदोलन समितीने विविध राजकीय संघटना, सामाजिक संघटना यांनी एकत्रित येत निवडणूक लढवत २१ जागा जिंकल्या होत्या. सत्ता जरी मिळविता आली नसली तरी त्यांनी विरोधी बाकांवर बसण्याची संधी त्यांना मिळाली होती. त्यावेळी २८ जून २०१० ते २८ जून २०१५ या पाच वर्षाच्या या कालावधीसाठी विनायक निकम यांनी विरोधी पक्ष नेता म्हणून कामगिरी बजावली होती. त्यानंतर २०१५ मध्ये दुसरी महापालिका निवडणूक झाली त्यात ११५ जागांपैकी १०६ जागा जिंकल्या होत्या. तर विरोधकांना दुहेरी अंक ही गाठता आला नव्हता त्यामुळे त्या काळात विरोधी पक्ष नेता म्हणून कोणीच नव्हते. तर करोनाचे संकट, आरक्षण प्रश्न अशा विविध कारणांमुळे पाच वर्षे निवडणूक झाली नव्हती. मात्र यंदाच्या वर्षी महापालिकेची तिसरी पंचवार्षिक निवडणूक पार पडली. ही निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली. यात बविआ आणि भाजप मध्ये संघर्ष पहायला मिळाला. यात ११५ पैकी ७१ जागा जिंकत बविआने आपले वर्चस्व सिद्ध केले तर दुसरीकडे यापूर्वी केवळ एक नगरसेवक असलेल्या भाजपने ४३ चा आकडा गाठत एक सक्षम विरोधक म्हणून आपले स्थान निश्चित केले. शुक्रवारी महापालिकेची पहिली महासभा पार पडली. या महासभेत विरोधी पक्ष नेत्यासाठी भाजपचे गटनेते अशोक शेळके यांनी मनोज पाटील यांच्या नाव सादर केले होते. पहिल्याच महासभेत विरोधी पक्ष नेते म्हणून भाजपचे मनोज पाटील यांची निवड करण्यात आली आहे. दहा वर्षांच्या कालावधी नंतर महापालिकेत विरोधी पक्ष नेता विराजमान झाले आहेत. मनोज पाटील हे महापालिकेतील दुसरे विरोधीपक्ष नेते ठरले आहेत. यापूर्वी विनायक निकम यांनी विरोधीपक्ष नेते पद भूषविले होते.

## लातूर जिल्हयातील वृध्द कलावंतांच्या ...

परिषदेच्या पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व पालकमंत्री नियुक्त जिल्ह्यातील १० जेष्ठ कलावंत साहित्यीक सदस्य असतात. लातुर जिल्ह्यातील सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षातील २८ जानेवारी २०२५ च्या बैठकीमध्ये व समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार सादरीकरणातून मंजुर करण्यात आलेल्या जिल्ह्यातील ज्येष्ठ कलावंतांची पंचायत विभागा मार्फत आधार पडताळणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सन २०२१ ते आज पर्यंत या कलावंतांना त्यांच्या हक्काचे शासनाचे मानधन मिळत नाही व शासनाचा योजना राबविण्याचा उद्देश सफल होत नाही. जिल्हा वृध्द कलावंत समितीचे सचिव जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या तीन वर्षाच्या मानधनास पात्र कलावंतांचे त्यांचे आधार पडताळणी करण्यात यावे अन्यथा दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद लातुर कार्यालयासमोर जिल्ह्यातील वयोवृध्द कलावंतांचे कला सादरीकरण धरणे व ठिय्या आंदोलन करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन भारतीय दलित पँथरच्या वतीने प्रदेशाध्यक्ष ॲड. रमेशभाई खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे, लातुर जिल्हा सांस्कृतिक प्रमुख धम्मपाल सावंत यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रति महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, बांधकाममंत्री तथा लातुर पालकमंत्री, सांस्कृतिक मंत्री, विभागीय आयुक्त, लातुरच्या जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. या निवेदनावर शाहीर राजरत्न सोनवणे, शाहीर सत्यवान जागदंड, शाहीर नितिन कांबळे, शाहीर दिलीप ढगे, शाहीर कैलास क्षिरसागर, शाहीर वामन हजारे, शाहीर सुभाष साबळे, गायिका छायाताई सपकाळ, गायिका सुमनबाई जोगदंड आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## वसई विरार शहर महापालिकेच्या पत्रकार ...

प्रतिनिधी आणि पत्रकार अशा विविध भूमिका पार पाडाव्या लागतात, याचीही त्यांनी दखल घेतली. पत्रकार बांधवांना जे जे सहकार्य लागेल ते करण्यास मी तसेच बहुजन विकास आघाडी तथा लोकनेते ठाकूर हितेंद्र ठाकूर व माजी युवा आमदार क्षितिज ठाकूर आम्ही सदैव तयार आहोत, असे आश्वासनही त्यांनी दिले. यावेळी वसई विरार महानगर पत्रकार संघाचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव पाटोळे यांच्या हस्ते महापौर अजीव पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. वसई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार संदीप पंडित, सुहास बिऱ्हाडे, इलेक्ट्रॉनिक मीडियाचे पदाधिकारी विजय गायकवाड, मंगेश कराळे, विजय खेतले आणि विवेक पाटकर, आशिष कदम, संजय मिश्रा यांनीही आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन केले. त्यांचा ही शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर उपस्थित सर्व पत्रकारांना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र वृत्तपत्र संघटनेचे अध्यक्ष भालचंद्र होलम, उपाध्यक्ष अरुण सिंग सरचिटणीस नितीन ठाकूर, कार्याध्यक्ष मच्छिंद्र चव्हाण, श्रीधर पाटील, सचिव संदेश काशीद, कोषाध्यक्ष राजेंद्र शर्मा, सुनीता पाटील, शहेनाज शेख, रायन डायस, संघटक विश्वप्रताप सिंग, नदीम चांदीवाला, राजकिशोर तिवारी, बाबाजी शिंदे, संदीप पालांडे व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने विविध वृत्तपत्राचे व वाहिन्यांचे पत्रकार प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय खेतले तर मान्यवरांचे आभार भालचंद्र होलम यांनी मानले.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त...

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या यंत्रणा व संस्थांचा सन्मान करण्यात येणार आहे. या अभियानाची व्यापक जनजागृती व्हावी यासाठी सोशल मीडियावर cleanpalghar greenpalghar plasticfreepalghar हे हॅशटॅग वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलूया आणि स्वच्छ, सुंदर पालघर घडवूया, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# पालघर जिल्ह्यात ९ आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्रांना NQAS राष्ट्रीय मानांकन




**पालघर : वार्ताहर**

जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे संपन्न झाली. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रामदास मराड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत साळुंके, आरएमओ डॉ. योगेश सुराळकर, डीआरसीएचओ डॉ. वैदही माळवी, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सचिन वाघमारे, जिल्हा नोडल अधिकारी (NQAS) तथा प्रभारी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. प्रांजली सावे तसेच जिल्ह्यातील सर्व ग्रामीण रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके (NQAS) हा भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयामार्फत राबविण्यात येणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. आरोग्य संस्थांमधील सेवा गुणवत्ता, औषध व साधनसामग्री व्यवस्थापन, रुग्ण तपासणी प्रक्रिया, रुग्ण समाधान, स्वच्छता व सुरक्षितता आदी बाबींचे केंद्रीय समितीमार्फत सखोल मूल्यमापन करून मानांकन दिले जाते.

पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे-जामसर, नांदगाव, साकुर व साखरशेत; विक्रमगड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र तलवाडा; वसई तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र भाताणे; तलासरी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आमगाव; तसेच डहाणू तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पोलवड या संस्थांना राष्ट्रीय मानांकन प्राप्त झाले आहे. जव्हार हा आकांक्षित तालुका असून तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय मानांकन मिळालेला तो जिल्ह्यातील एकमेव तालुका ठरला आहे. तसेच डहाणू तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र सामवन यांनी राष्ट्रीय मानांकनासाठी अर्ज सादर केला आहे. याशिवाय, आयुष्मान आरोग्य मंदिर न्याहाळे खुर्द (ता.जव्हार) या संस्थेला राष्ट्रीय मानांकन प्राप्त झाले असून जिल्ह्यातील अन्य २३ आयुष्मान आरोग्य मंदिरांना राज्यस्तरीय मानांकन मिळाले आहे. राष्ट्रीय मानांकनाची प्रमाणपत्रे संबंधित आरोग्य संस्थांना मा. जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी त्यांनी सांगितले की, हे मानांकन केवळ गुणांचे मोजमाप नसून रुग्णकेंद्रित, सुरक्षित व शिस्तबद्ध आरोग्य सेवा देण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण आणि सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. जिल्ह्यातील आरोग्य सेवा राष्ट्रीय दर्जाची असल्याचे हे प्रतीक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी तसेच जिल्हास्तरीय गुणवत्ता पथकाचे (NQAS) विशेष कौतुक केले. या यशामध्ये तत्कालीन डीआरसीएचओ डॉ. सागर पाटील, तत्कालीन तालुका आरोग्य अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी (जव्हार) डॉ. किरण पाटील, तसेच डॉ. प्रांजली सावे यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरल्याचे नमूद करण्यात आले. या उल्लेखनीय यशासाठी सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक तसेच आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले असून जिल्हा प्रशासनाने त्यांच्या कार्याचे अभिनंदन केले आहे.

# पालघर जिल्हा परिषद येथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांची जयंती साजरी



**पालघर : वार्ताहर**

जिल्हा परिषद पालघर येथे मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती आज साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) व्यंकटराव हुंडेकर तसेच जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर उपस्थित होते. यावेळी हसनाळकर यांनी जांभेकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारितेतील मोलाच्या योगदानाचे स्मरण केले. समाजप्रबोधनाच्या कार्यात त्यांनी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी संख्येने उपस्थित होते.



**दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे, जगदीश कुलकर्णी आदींसह मंत्रालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.**

# वाडा येथे राजेश पाटील सरांचे प्रबोधनात्मक शिवव्याख्यान




**वाडा : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या (एस.टी.) वाडा आगार येथे 'समस्त रा.प.म. कर्मचारी वृंद' यांच्या वतीने आयोजित शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. उत्सवाची सुरुवात सकाळी १०:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या भावपूर्ण पूजनाने करण्यात आली. त्यानंतर, सुप्रसिद्ध शिवव्याख्याते व निवेदक राजेश पाटील यांचे 'शिवव्याख्यान' आयोजित करण्यात आले होते. आपल्या व्याख्यानातून त्यांनी महाराजांच्या युद्धनीतीसोबतच त्यांच्या प्रशासकीय कौशल्यांचे दर्शन उपस्थितांना घडवले. व्याख्यानानंतर दुपारी उपस्थित सर्व कर्मचारी आणि नागरिकांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला वाडा नगरपंचायतीचे नगरसेवक उनेश लोखंडे, अजिंक्य पाटील, विराज पाटील, भूषण जगताप, मनीष देहेरकर, नगरसेविका भारती सपाटे, प्रगती वलटे, रिता थोरात यांच्यासह आगार व्यवस्थापक भुषन बेन्द्रें, वाहतुक नीरीक्षक रघुनाथ मीसाळ, चालक शरद बोराडे, राहुल देशमुख, सुधाकर तावडे, गणेश आठरे तसेच आगारातील सर्व अधिकारी, कर्मचारी, चालक, वाहक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सालाबादप्रमाणे राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे एस.टी. कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# ग्रामपंचायत खानिवलीला राज्याचा द्वितीय पुरस्कार आणि भूमी थीममध्ये राज्यात प्रथम क्रमांक



**वाडा : वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने माझी वसुंधरा अभियान या पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या दिशेने सातत्यपूर्ण व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना शासनाच्या वतीने दर वर्षी पारितोषिक दिले जाते. या मध्ये खानिवलीने पुन्हा एकदा राज्यस्तरावर आपली छाप पाडली आहे. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत ग्रामपंचायत खानिवलीला राज्याचा द्वितीय पुरस्कार जाहीर झाला असून 'भूमी' या थीमॅटिक क्षेत्रात संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम पारितोषिक मिळाले आहे.एकूण सव्वा कोटी रुपयांचे बक्षीस ग्रामपंचायतीला मिळाले आहे. यापूर्वीही माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये ग्रामपंचायत खानिवलीने कोंकण विभागात प्रथम क्रमांक पटकावला होता. सलग दोन अभियानांतील हे उल्लेखनीय यश ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण, नियोजनबद्ध आणि लोकसहभागावर आधारित कार्यपद्धतीचे प्रतीक आहे. 'भूमी' या क्षेत्रात ग्रामपंचायत खानिवलीने मृदसंवर्धन, वृक्षलागवड, सेंद्रिय शेती प्रोत्साहन, प्लास्टिक संकलन व निर्मूलन, घनकचरा व्यवस्थापन, कंपोस्ट खत निर्मिती, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान, जलसंधारणाशी संलग्न उपक्रम अशा विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली. वृक्षांची लागवड व संगोपन, सेंद्रिय शेतीला चालना व शेतकऱ्यांचे मार्गदर्शन, प्लास्टिक मुक्त गावासाठी विशेष मोहीम, कचरा वर्गीकरण व ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प, ग्रामसभेतून पर्यावरण जनजागृती या सर्व उपक्रमांमुळे गावातील पर्यावरणीय समतोल राखण्यास आणि शाश्वत विकास साध्य करण्यास मोठी मदत झाली आहे.

**नेतृत्व व लोकसहभागाचा परिणाम**

ग्रामपंचायत खानिवलीचे सरपंच भरत पांडुरंग हजारे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत उपसरपंच सागर पाटील, ग्रामपंचायत अधिकारी शशिकांत ठाकरे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पंकज चौधरी, सदस्य प्रेरणा पोटिंदा, सारिका पाटील, निकिता वाघ, रमेश डुकले, फिरदोस काझी, कर्मचारी निलेश मोहणे, गणेश पोटिंदा, काव्या पाटील, रश्मी पाटील, गोकुळ मोहणे, करण भोईर, समीर शेख, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, बचत गट, युवक मंडळे व जि.प.मराठी शाळा, जि.प.उर्दू शाळा आ.ल.चंदावरकर विद्यालय तसेच ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून हे यश संपादन झाले आहे. नियोजनबद्ध कृती आराखडा, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन ही या यशामागील प्रमुख कारणे आहेत.

यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी वैभव शिंदे, विस्तार अधिकारी पंचायत वसंत अहिरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. ग्रामपंचायत खानिवलीने पुढील काळात कार्बन न्यूट्रल गाव, अधिक वृक्षलागवड, सेंद्रिय शेती विस्तार, जल व मृद संवर्धन आणि शाश्वत ग्रामविकासाच्या दिशेने आणखी व्यापक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. या राज्यस्तरीय यशाबद्दल ग्रामपंचायत खानिवलीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, हा सन्मान संपूर्ण पालघर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

# लाखो भाविकांनी घेतले तिळसेश्वराचे दर्शन; यंदा रेकॉर्ड ब्रेक गर्दी



**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील तीळसा येथील प्राचीन शिवमंदिरात महाशिवरात्री निमित्त तिळसेश्वराच्या दर्शनासाठी शिवभक्तांची गर्दी उसळली होती. वाडा शहरापासून नऊ किलोमीटर अंतरावर असलेले महादेवाचे मंदिर हे वैतरना नदीपात्रात अखंड दगडावर बांधलेले असून ते पुरातन असल्याने दरवर्षी याठिकाणी महाशिवरात्रीच्या दिवसी मोठी जत्रा भरते. ठाणे पालघर जिल्ह्यातील अनेक भक्त शिव दर्शनासाठी येथे येतात. येथील पाण्यात मोठ मोठे देवमासे असल्याने त्यांना पाहण्यासाठी गर्दी होत असते, तर हे मासे फक्त महाशिवरात्रीच्या दिवशी दिसतात असे भक्तांची धारणा आहे. दरवर्षी पेक्षा यावर्षी गर्दीने उच्चांक गाठला असून लाखों भक्तांनी दर्शन घेतले, वाडा आगाराने दर दहा-दहा मिनिटांनी बस सोडल्याने भक्तांची चांगली सोय झाली. दरम्यान वाडा पोलिसांनी चोख बंदोबस्तात ठेवला होता. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

# पुण्यस्मरणानिमित्त मोफत आरोग्य शिबिर संपन्न



**वाडा : वार्ताहर**

कै.बळीराम यशवंत (दाजी) म्हात्रे यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित करण्यात आलेले आरोग्य तपासणी व होमिओपॅथिक औषधोपचार शिबिर उत्साहात संपन्न झाले. जनसेवा मंडळ ट्रस्टचे साई होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि नित्यानंद हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर गणेश मैदान, वाडा येथे पार पडले. आयोजित या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच आवश्यकतेनुसार मोफत होमिओपॅथिक औषधोपचार देण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवेचा लाभ मिळाला. शिबिर यशस्वी आयोजनासाठी डॉ. सुधीर म्हात्रे, नितीन म्हात्रे, महेश म्हात्रे व समस्त म्हात्रे परिवार यांनी परिश्रम घेतले. या सामाजिक उपक्रमाबद्दल आयोजकांचे आभार मानले.

# भिवंडी-वाडा-मनोर महामार्गावरील गटारीच्या कामात निष्काळजीपणामुळे अपघाताचा धोका

**वाडा : वार्ताहर**



भिवंडी-वाडा-मनोर या महत्त्वाच्या महामार्गावर सध्या रस्त्याच्या काँक्रीटीकरणासह दुतर्फा गटारीचे काम सुरू आहे. मात्र हे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्याच्या दुरुस्तीतील दिरंगाईमुळे वाहतूक कोंडी वाढली असून प्रवाशांची मेटाकुटी होत आहे. त्यातच वाडा-मनोर रस्त्याच्या कडेला सुरू असलेल्या गटारीच्या कामासाठी खोदकामातून काढलेले दगड, माती व बांधकाम साहित्य बेवारस अवस्थेत रस्त्याच्या कडेला टाकण्यात आले आहे. या साहित्यामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली असून दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना नाहक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः दुचाकी वाहन घसरून पडण्याचे प्रकार घडत असून अपघाताचा धोका वाढला आहे. काम सुरू असताना आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था, सूचना फलक व अडथळे लावण्यात आले नसल्याने प्रशासनाच्या निष्काळजीपणावर नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्त्यावर पडलेले साहित्य हटवून कामाला गती द्यावी, अन्यथा मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्याचे वाहनधारकांचे म्हणणे आहे.

# नाणेत शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




**वाडा : वार्ताहर**

कोहोज किल्लयाच्या पायथ्याशी असलेल्या नाणे येथे कृष्णांग सेवाभावी क्रांतीतर्फे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हनुमान मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात परिसरातील तब्बल ४३ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. नालासोपारा येथील साथिया ब्लड ट्रस्ट यांच्या सौजन्याने व संस्थेचे प्रणेते क्रांतीसेवक नितीन वासुदेव पाटील व सहकारी क्रांती दूत यांच्या पुढाकाराने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवजयंतीपूर्वी मंगळवारी संपूर्ण नाणे गावात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. गावातील गल्लीबोळ तसेच तोफ परिसर स्वच्छ करण्यात आला. ग्रामस्थांनी सडा-रांगोळी काढून परिसर सजविला. तोफेचे पूजन करून हनुमान मंदिरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. शिवपूजनानंतर सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. शिवगर्जनाने परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाच्या शेवटी काश्मीरमधील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रभक्तीपर वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# कादिवली पाडा येथे शिवजन्मोत्सव उत्साहात संपन्न



**वाडा : वार्ताहर**

वाड्यातील कादिवली येथे शिव छत्रपती मित्र मंडळाच्या वतीने शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त लहान-थोरांचा सहभाग असलेली भव्य पालखी कादिवली येथून गावदेवी मंदिरापर्यंत काढण्यात आली. पालखी मार्गावर जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. गावदेवी मंदिरात पोहोचल्यानंतर मंदिराच्या शिखरावर शिवध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून उपस्थितांनी अभिवादन केले. कार्यक्रमात शिवचरित्रावर आधारित घोषणांनी वातावरण भारावून गेले. तर वाडा ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

या सोहळ्याला शिवछत्रपती मित्र मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ, युवक-युवती, महिला आणि बालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक एकोप्याचे दर्शन घडले, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# रणधीर ढोल ताशाच्या उत्तम वादनाने शिवजयंती उत्सव रंगला



**नालासोपारा : वार्ताहर**

नालासोपारा पूर्व येथे पाच आंबा केशरी पार्क रिक्षा चालक-मालक संघटना यांनी शिवजयंती उत्सव आयोजित केला होता. सदर उत्सवामध्ये प्रमुख आकर्षण म्हणून विरार येथील रणधीर ढोल ताशा पथक यामधील सर्व वादकांच्या उत्तम वादनाने सर्व परिसर दुमदुमून गेला. सदर विशेष आकर्षण पाहण्यासाठी परिसरातील सर्वच युवा आणि ज्येष्ठ नागरिकांनी तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करण्यासाठी जमलेल्या सर्वांनीच गर्दी केली. सदर वादनामध्ये शिवगर्जना देऊन महाराजांना अभिवादन करण्यात आले. तसेच जय भवानी जय शिवाजी या घोषणेने वादनाची रंगत वाढली. आयोजक रिक्षा चालक-मालक संघटना यांच्या पदाधिकाऱ्यांनी सर्वच वादकांचे अभिनंदन केले आणि त्यांना विशेष शुभेच्छा दिल्या. शिवभिषेक, सत्यनारायण महापूजा, महाराजांची आरती आणि सुस्वर भजनाने संपूर्ण दिवस संपन्न झालेल्या पूर्वनियोजित कार्यक्रमाची सांगता झाली. याच वादनाच्या वेळी रणधीर ढोल ताशा पथकाची एकूण ५० वादने पूर्णत्वास गेली, त्यामुळे वादकांमध्ये एक विशेष आनंदमय वातावरण दिसून आले.

# वसई विरार महापालिकेच्या महासभेत १६ सदस्यांची स्थायी समिती गठीत!

## • बविआच्या १० तर भाजपच्या ६ सदस्यांना संधी • विरोधी पक्षनेतेपदी मनोज पाटील





**विरार : वार्ताहर**

शुक्रवारी पार पडलेल्या वसई विरार महापालिकेच्या पहिल्याच महासभेत स्थायी समिती सदस्यांची निवड करण्यात आली. या समितीत एकूण १६ सदस्य निवडण्यात आले. यात बविआच्या १० तर भाजपकडून ६ सदस्यांची वर्णी लागली आहे. वसई-विरार महापालिकेच्या निवडणुकीत बहुजन विकास आघाडीचे काँगेसच्या एका उमेदवारासह ७१ नगरसेवक तर महायुतीचे ४४ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे पक्षीय संख्याबळानुसार त्यांना स्थायी समितीवर बहुजन विकास आघाडीला १० सदस्य पाठविण्याची तर महायुतीला ६ सदस्य पाठविण्याची संधी होती. वसई विरार महापालिका निवडणुका पार पडल्यानंतर शुक्रवारी महापौर अजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पहिली महासभा आयोजित करण्यात आली होती. या महासभेत महापौर व उपमहापौर अभिनंदन प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर स्थायी समिती सदस्य निवडीचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. यासाठी दोन्ही गटनेत्यांकडून सदस्यांची नावं नगरसचिवांकडे देण्यात आली होती. पहिल्या महासभेत बविआचे १० व भाजपचे ६ सदस्य निवड करण्यात आली. महापौर अजीव पाटील यांच्या मार्फत हा ठराव महासभेत मंजूर करण्यात आला. बहुजन विकास आघाडीकडून प्रवीण शेट्टी, नरेंद्र पाटील, लॉरेल डायस, पंकज पाटील, रंजना थालेकर, प्रफुल्ल पाटील, चंद्रशेखर धुरी, सुनील आचोळकर, स्वप्निल कवळी व आलमगीर डायर या नगरसेवकांचा समावेश आहे तर भाजप मधून प्रज्ञा पाटील, महेश सरवणकर, दर्शना त्रिपाठी, निलेश चौधरी, जितेंद्र पाटील, अभय कक्कड हे नगरसेवकांची स्थायी समिती सदस्य पदी नियुक्ती केली आहे. तर भाजपचे मनोज पाटील यांची विरोधी पक्षनेता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

वसई विरार महापालिकेची तिसरी पंचवार्षिक निवडणूक अत्यंत अटीतटीची झाली. यात बहुजन विकास आघाडीने जरी स्पष्ट बहुमताचा आकडा गाठला असला तरी दुसरीकडे भाजपने ४३ चे संख्याबळ मिळवित एक सक्षम विरोधक म्हणून स्थान पक्के केले आहे. त्यामुळे दहा वर्षांच्या कालावधी नंतर महापालिकेत विरोधीपक्ष नेता बसला. पहिल्या महासभेत भाजपचे मनोज पाटील यांची विरोधी पक्षनेता म्हणून नियुक्ती ...पान ६ वर

# छत्रपती शिवाजी महाराजांची जिद्द व स्वराज्य स्थापनेचा प्रवास आजही विद्यार्थ्यांना दिशादर्शक आहे -संदिप पंडित





**वसई : वार्ताहर**

शिवछत्रपती शिवाजी महाराजांची जिद्द आणि स्वराज्य स्थापनेचा प्रवास विद्यार्थ्यांना दिशादर्शक आहे, आजही महाराजांचे युद्ध कौशल्य आणि त्यांच्या रणनीती चा अभ्यास आंतरराष्ट्रीय पातळीवर केला जातो, विद्यार्थी मित्रांनी महाराजांच्या इतिहासामधून मोठी स्वप्ने पाहणे आणि ती जिद्धी ने पूर्ण करणे हे शिकण्यासारखे आहे असे प्रतिपादन वसई तालूका पत्रकार संघाचे अध्यक्ष संदिप पंडित यांनी शिव छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या ३९६व्या जयंती निमित्त विरार स्थित नॅशनल इंग्लिश स्कुल च्या कार्यक्रमात केले. या कार्यक्रमाला स्कुलचे संस्थापक दीपक कुलकर्णी, तनुजा कुलकर्णी, आणि रुपाली पाटील व इतर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम,महाराजांच्या जीवनावरील नाटय छटा सादर केल्या. शाळेतल्या मुलींनी प्रतापगडावरील अफझलखान भेटीच्या पोवाड्याने सर्वांची मने प्रफ्फुलीत केली. मुलांना नृत्य प्रज्ञा आणि सोनाली सोनगिरे यानी बसवली होती. मिरीयमच्या शाळेतील मुलांना महाराजांचा इतिहास कळावा यासाठी शाळेच्या पाचव्या मजल्यावर शाळेतील चित्रकला शिक्षक विराज जोशी, निरज मिश्रा, सिद्धेश चिंदरकर आणि राहुल होवाल यांनी महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रांचे दालन तयार केले असून त्याचे उदघाटन आज झाले आजच्या कार्यक्रमाला इतर शिक्षक आणि पालक वर्ग मोठ्या प्रमाणत उपस्थित होते.

# लातूर जिल्हयातील वृध्द कलावंतांच्या मानधनासाठी भारतीय दलित पँथरचे धरणे आणि ठिय्या आंदोलन



**लातुर : वार्ताहर**

गेल्या १४-१५ महिन्यांपासून सन २०२१-२४ या तीन वर्षाच्या मानधनास पात्र निवड केलेल्या कलावंतांचे आधार पडताळणी न केल्याने २५ फेब्रुवारी २०२६ रोजी भारतीय दलित पँथरचे जिल्हा परिषदेसमोर वयोवृध्द कलावंत व साहित्यकांसह कला सादरीकरण, धरणे व ठिय्या आदोंलन करण्यात येणार असल्याची माहिती संजयभाऊ कांबळे यांनी दिली. वाढत्या वयामुळे कलावंत अनेक अजारांनी ग्रस्त असल्यामुळे त्यांना वेळोवेळी वैद्यकीय उपचार व औषधोपचारासाठी पैशांची सतत आवश्यकता भासते. या कलावंतांना उपजिवीकेसाठी महाराष्ट्र शासनाचे वतीने जेष्ठ कलावंत, साहित्यीकांना आधार प्रणाली व्दारे महाडीबीटीने मानधन देण्यात येते. जेष्ठ कलावंतांचे या मानधनावर वृध्दापकाळी जीवन चरित्र अवलंबून असते. या कलावंतांची निवड समितीमध्ये अध्यक्ष जिल्हाधिकारी, सचिव जिल्हा ...पान ६ वर

# वसई विरार शहर महापालिकेच्या पत्रकार कक्षात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची २१४वी जयंती उत्साहात साजरी

## महापौर अजिव पाटील यांचा ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मणराव पाटोळे यांच्या हस्ते सत्कार







**विरार : वार्ताहर**

वसई विरार शहर महानगरपालिकाच्या पत्रकार कक्षामध्ये आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची २१४वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महापौर अजीव पाटील यांनी दीप प्रज्वलन करून जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी बोलताना महापौर अजीव पाटील यांनी जयंती कार्यक्रम केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित न ठेवता पत्रकारितेच्या मूल्यांची जपणूक करण्याची गरज व्यक्त केली. पत्रकार अन्यायाला वाचा फोडण्यासाठी असतात आणि समाजाला आरसा दाखवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते करतात, असे त्यांनी नमूद केले. आजच्या काळात काही पत्रकारांना स्वतःलाही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली असल्याचे त्यांनी खेदाने सांगितले. पूर्वीची पत्रकारिता आणि आताची पत्रकारिता यात मोठा बदल झाल्याचे सांगत त्यांनी आजच्या पत्रकारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे स्पष्ट केले. 'रागावर नियंत्रण ठेवेल तो राज्य करेल' असे म्हणत राग व्यक्त करताना देखील न्यायाची बाजू मांडण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सध्याच्या पत्रकारांना जाहिरातदार, ...पान ६ वर

# जिल्हा परिषद पालघर येथे उत्साहात शिवजयंती साजरी



## 'उल्हास' ॲपच्या जिल्हा वार्षिक विशेषांकाचे प्रकाशन

**पालघर : वार्ताहर**

जिल्हा परिषद पालघर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास) व्यंकटराव हुंडेकर आणि जिल्हा परिषद संवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या शौर्य, दूरदृष्टी, स्वराज्य स्थापनेतील योगदान आणि न्यायनिष्ठ प्रशासनाचा आदर्श अधोरेखित केला. महाराजांनी रयतेच्या कल्याणाला प्राधान्य देणारी लोकाभिमुख व सर्वसमावेशक शासनव्यवस्था निर्माण केली. त्यांच्या विचारांचे आचरण हीच खरी त्यांना अभिवादन ठरेल, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अशोक पाटील, शिक्षणाधिकारी (योजना) शेषराव बडे, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.शशिकांत साळुंखे तसेच जिल्हा परिषदेचे विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या आदर्शांचे स्मरण केले. याच प्रसंगी शिक्षणाधिकारी (योजना) यांच्या पुढाकारातून विकसित करण्यात आलेल्या 'उल्हास ॲप'च्या माहितीपर पुस्तिकेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच पालघर जिल्हा वार्षिक विशेषांक २०२५-२६ चे प्रकाशन करण्यात आले. या विशेषांकात उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमासह जिल्ह्यातील विविध शैक्षणिक उपक्रमांचा संक्षिप्त आढावा सादर करण्यात आला आहे. उत्साही व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाने उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा आणि समाजाभिमुख कार्याची भावना अधिक दृढ केली.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त स्वच्छता पंधरवडाचा जिल्ह्यात शुभारंभ

## प्लास्टिक मुक्त, दुर्गंधी मुक्त व स्वच्छ सुंदर पालघरसाठी व्यापक लोकचळवळीचा संकल्प



**पालघर : वार्ताहर**

१९ फेब्रुवारी, २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभदिनी पालघर जिल्ह्यात स्वच्छता पंधरवडाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, पालघरचे तहसीलदार रमेश शेडगे तसेच प्रकल्प संचालक (जिल्हा परिषद स्वच्छ मिशन) अतुल पारसकर तसेच विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत या अभियानाची सुरुवात झाली. यावेळी शालेय विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली काढण्यात आली, स्वच्छतेची सामूहिक शपथ घेण्यात आली तसेच तहसील कार्यालय परिसरात प्रत्यक्ष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. उपस्थित अधिकाऱ्यांनी स्वच्छतेचा संदेश देत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. प्लास्टिक मुक्त, दुर्गंधी मुक्त व स्वच्छ सुंदर पालघर जिल्हा या अभियानांतर्गत १९ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड व मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व तालुका प्रशासनाला प्रभावी अंमलबजावणीच्या सूचना दिल्या आहेत. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्र, राष्ट्रीय महामार्ग, एमआयडीसी परिसर, आठवडी बाजार, नदी-नाले, तलाव, समुद्र किनारे आदी ठिकाणी साचलेला प्लास्टिक व इतर कचरा हटविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील कचऱ्याचे ढिगारे (Legacy Waste Sites) व ब्लॅक स्पॉट ठिकाणांची स्वच्छता करून त्यांचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. जिल्ह्यात प्लास्टिक निर्मिती, विक्री, वितरण व वापरावर कडक बंदी लागू करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. मोहिमेचे मूल्यमापन करण्यासाठी विशेष प्रश्नावली तयार करण्यात आली असून ...पान ६ वर

